विषय काव्य
सं. क्र. 2342



# युकॅलिप्टस

सुरेश मथुरे

REFBK-0022315
REFBK-0022315

१

**ग्रेस**

संध्याकाळच्या कविता

२

**ना. धों. महानोर**

रानातल्या कविता

३

**अनुराधा पोतदार**

आवर्त

४

**शंकर वैद्य**

कालस्वर

५

**वसंत सावंत**

स्वस्तिक

६

**केशव मेश्राम**

उत्खनन

# युकॅलिप्टस

सुरेश मथुरे

REFBK-0022315
REFBK-0022315

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

*Eucalyptus*
*( Marathi )*
*Suresh Mathure*

युकॅलिप्टस
पॉप्युलर प्रकाशन
म—४१४

© सुरेश मथुरे
मथुरे बंगला, गावदेवी मैदान रस्ता, ठाणे-२
पहिली आवृत्ती : १९७७ / १८९९

मुखपृष्ठ : पद्मा सहस्रबुद्धे

मुद्रक : शशिकांत महादेव देव, सुलभ मुद्रणालय, २९१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०
प्रकाशक : रामदास भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी ताडदेव रोड, मुंबई ४०००३४

ती. भाऊ आणि सौ. वहिनी

यांस

या संग्रहातील बहुतेक कविता ‘ सत्यकथा ’ मासिकात प्रसिद्ध झाल्या. इतर काही प्रतिष्ठान, छंद, युगवाणी, मराठवाडा, संदर्भ, ऋचा आदि नियतकालिकांनी प्रसिद्ध केल्या.

त्या त्या संपादकांचा मी आभारी आहे.

सर्वश्री मंगेश पाडगावकर, डॉ. मधुकर हजिरनीस, प्रा. शंकर वैद्य, यांच्या आपुलकीवर ‘ युकॅलिप्टस ’ उभा राहिला.

श्री. रामदास भटकळ आणि श्री. राम पटवर्धन यांचे ऋण तर न विसरता येणारे आहे…

# अनुक्रमणिका


युकॅलिप्टस ९
मी फक्त म्हणेन १०
वेस वर्तुळून टाकणारा ११
मावळतीवर १२
पाणी १२
पाकोळीनेही ठेचाळावे १३
मुलाला घेऊन जायन्टव्हीलमध्ये १४
स्वप्ने पाहतात १५
स्तब्ध स्तब्ध पापणीत १६
माझा सूर गिरवणारा १७
चित्र १८
नुकते कोठे उमलू लागले आहेत १८
इथे असा आज एकटा बसून १९
माझे मन बहरते २०
ही तर माझी अन्नदायिनी २१
गुलतुरा २२
जास्वंद २३
दिवस जेव्हा मागे मागे २३
हा शरद चांदण्याचा २४
रात्र जाते प्रत्येकाच्या २५
नकाशा २६
स्वप्नांनो आणि सत्य घटनांनो २७
मत्स्यालय २९
असे अस्तावणाऱ्या सूर्यासारखे ३०
श्रवणबेळगोळा ३१
त्या रित्या रित्या तृप्तीचा ३२
मशरूम ३३
कॉंक्रीटचे क्रॉसवर्ड ३४
रोलिंग करणारा एक इटुकला ३५
मजबूत मनाच्या चिरेबंदी ३६
पूर्णविरामापलीकडे ३७
नगण्य गोतांशीसुद्धा ३८
सावट ३९
ऑर्किड ४०
भडभडून कोसळेल ४१
पाऊस : प्रतिबिंबांचा पाऊस ४२
केस विंचरून सुटत नाही ४३
दूर दूर गावाबाहेर... पुस्तकाबाहेर ४४
सततच तिच्या वराभोवती ४५
तमे बरेचसे मोह टाळले ४६
भिंतीवरच्या सूर्य-कोळ्याचे धागे ४७
नाते ४८

शब्दांनो ४९
सी-साइड रिसोर्टमधल्या ५१
सांजेच्या सांझरात ५२
टेट्रापॉड्स् ५३
सूर्यफुली चेहऱ्याची कोळीण ५४
ब्लँकेटी एकान्ताहून खोल खोल ५४
समुद्र ५५
स्कायस्क्रेपर ६१
कॅक्टस ६२
साई सुट्ट्यो ६३
उकाराच्या सफाईने ६४
किडनी-पर्व ६५
ब्रा-वंदवण ६७
आम्ही आपल्या ऐकाव्या ६८
दूरवर दुपारभर ६९
कसाटा ७०
जसे मेरी-गो-राउंडचे घोडे ७१
आपल्याला जमत नसते हे ७२
फ्रायओव्हर ७३
उद्याच्या सॉफिस्टिकेटेड ७४
स्कायलाइन ७५
चपापतो माझ्याआडला मी ७६
मनातल्या बुलडोझरने त्याने ७७
अशीही माणसे आढळतात ७८
काठोकाठ ब्रॅकायटलेला ७९
सिंपल हार्मोनिक मोशन ८०
स्कायलॅब ८१
पाखरांनो, मारणार का सी. एल.? ८२
ट्रॅफिक आयलंड ८४
पावसाळे आले... गेले... ८६
कॉक्रीट—स्लॅबच्या
डोंगर-डोलाऱ्याला ८७
जगणे त्यांचे ८७
अटळ अॅलर्जी ८८
लखलखून अंधारणारी ८९
धगधगीत अंजारू-गोंजारू ९०
बझर गरजला ९१
आरसा ९२
स्टफ करून ठेवलेला पक्षी ९३
म्हटले हे काही खरे नाही ९४
जगेन म्हणतो ९४
झाड ९५
माझे हात इतके लांब व्हावेत ९५
फिरविता येत नाही काळ ९६

# युकॅलिप्टस

कोडाईकॅनालच्या डोंगरदऱ्यात आला मी प्रथम पाहिला.
तेव्हा हा ईव्हिनिंग वॉक घेण्यासाठी रेस्टारंटमधून बाहेर
पडत होता. फुलाफुलांचा स्कार्फ, डोक्यावर मेंढ्याची हॅट आणि

तोंडात भला मोठा संबोरी पाईप. बरोबर खुज्या झुडुपाचा
अस्सल कुत्रा. माझ्याकडे त्याने पाहिले न पाहिले काय.
फ्रीजमध्ये कुल्फी ठेवताना करावे अनादरी दुर्लक्ष तसे!

चर्चच्या घंटेचा 'आमेन' त्याच्या कानावर आदळत आपटत
होता. पण हा होता मावळतीची रजत-कपेरी आरास पहात.
सरकसोट कडा सरडा होऊन क्षितिज-कुंपणावर उडी मारत

होता. तेच तो पहात होता. पाईपमधून ढगांचे लोट सोडत.
कॉकटेलच्या दर्दी कैफात. ओज्या नैतबुद्धी कठेक्टरा प्रमाणे.
मी पुन्हा आडवाटेने त्याच्यासमोर येऊन उभा राहिलो,

जरा खाकरलो, खोकलो. तेव्हा गलिव्हरच्या झोकात त्याने मला
हात केला. आणि मी लिलिपुटी राज्याचा रहिवासी झालो.
माझ्या अवतीभवती भातुकलीची घरे होती....

बाहुल्यांची माणसे होती....

दरीत पडलेली त्याची लांबचलांब मेघरलंडी सावली
खाली खाली घसरत होती.... लिलिपुटी राज्याची वेस
नदीचा कलाकुती केस होऊन थेट चमकत होती तिथपर्यंत.



## मी फक्त म्हणेन

छातीवरती गुद्देबाज हुद्दे नाहीत
प्रेषिताची पेरिस्कोपिक दृष्टी नाही
नजर नाही शास्त्रज्ञाची दुर्बिणडोळी
दरोडखोरी पाय नाहीत धाक-जरबी
कलाकारी हात नाहीत किमया-शिल्पी
काय आहे—काय नाही कुणी कधी पुसले
तर मी फक्त म्हणेन माझ्याही सावलीला
जाडी नाही मर्त्यांची नाडी प्रपातवणारी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२७७५
दा. क्र. काव्य
२३८३
ग्रंथ शाखा

## वेस वर्तुळून टाकणारा

वेस वर्तुळून टाकणारा रानदांडगा डोंगर
कुणासाठी सरपटत आहे ? चित्रांतल्या
सपाट शिल्पांप्रमाणे खिदळणाऱ्या पावलांच्या छाया
कुणासाठी धडपडत आहेत ? कुणाच्या शोधात
सावल्यांचे पेटवून पलिते सांजवाट सुसाट
धावत आहे ? फर्लांगांचे दगड धपापत आहेत ?
कुणासाठी ? कशासाठी ? किती काळ ही धडपड ?

नको वाटते विश्वाचे हे स्पंदन, काळाची धडधड,
सारी धावपळ विरून जाऊ दे, सरून जाऊ दे,
दृष्टीआड होऊ दे सेकंदांचा काफिला. ताडपत्री
सूर्यालाही मिळू दे अंधारसमाधी खोल खोल
अंतरही होऊ दे दोन क्षणांमधले अर्धबिंदूइतके अबोल
साबणाच्या फुग्याप्रमाणे फुगताना रंगणारा पट्कन
फुटून जाऊ दे हा विराट अलगद विश्वगोल.

## मावळतीवर

मावळतीवर चिता निवाली
सांजढगांची धग ओसरली
बघता बघता डोळे भरुनी
सूर्यफुलाने मान नमविली....

## पाणी

पाणी : हे दिसते पिसारा फुलवलेल्या मत्त मयूराप्रमाणे
रम्य. निळेभोर. याच्या प्रपाती जिभेने उडवलेले नसतात
कुणाकुणावरती शिंतोडे. याच्या सागरकानांनी ऐकलेली असते
साम्राज्याची गाज. नितळ तळ्याच्या याच्या डोळ्यांनी
टिपलेले असतात असंख्य संस्कृतींचे अवशेष....साद-पडसाद....
इतिहासाच्या प्रस्तरात फॉसिल्स झालेले....
हिंस्र श्वापदांप्रमाणेच याच्या नाकातोंडात वेसण
घातली जाते. याला राबवले जाते. नाचवले जाते. घाण्याला
जुंपले जाते. कधी तरी याचा संताप अनावर होतो.
एक मारून हिसका हे उधळते वेबंद. कडाकडा तोडून
कड्या कोयंडे....तेव्हा आपोआप उघडतात
धरणांचे पिंजरे. नाकातोंडातली सुटताना वेसण याच्या
उलटते एखादी पुण्यनगरी
.... उलटणाऱ्या दौतीप्रमाणे
उरात घेऊन परार्ध शब्दांचा निःशब्द अव्धी निळाघोर.

## पाकोळीनेही ठेचाळावे

पाकोळीनेही ठेचाळावे असा गुडुप खोल अंधार. कुबट
वास. शिवाशिवी खेळणारे साद पडसाद. विरक्तीचा साज
पांघरून निर्वाणी महानिद्रेत झोपी गेलेले प्रस्तरी लेणे.
समई लावावी तसे उजळत जाते मुग्ध मुलायम बुद्धमूर्तींचे
मंदस्मित. आणि पसरतो लेण्याच्या घुमटात ऊन-उणा उजेड.
काजळकाळा काना कोपरा होतो जागा....
प्रकाशात उमलते पापणीआडचे स्वप्न.
एकेक खांब सामोरा येतो, उलगडत उकलत अंगांगावरची रेशमी
मिहिरपी कलाकुसर. लावण्यमय रंभा उर्वशी लगबग उठतात....
विवस्त्रता आवरताना धांदलीत विसरतात बंदवणे अवजड 'ब्रा'
...अभ्रा जसा भरगच्च भरलेला तसे छत सरकते वर वर वर
स्वरांसारखे लचकतात एकेक सर्पवर्तुळी आकार स्प्रिंगच्या जोषात
अखंड लेणेच बनते एक अनमोल गाणे, लावण्यमय मयसभा,
मी उभा
चकित चित्राप्रमाणे स्तब्ध शिल्पच होऊन हाडामासांचे अबोल मुग्ध
माझ्या भोवती जमतो काम-गंडी शिल्पांचा वग
नितंबात रग आणि ओठावर घोगरा धम्म-जोग

## मुलाला घेऊन जायन्टव्हीलमध्ये

मुलाला घेऊन जायन्टव्हीलमध्ये बसावे
म्हणजे भीती वाटत नाही. आणि वयसुद्धा
विसरता येते. आणि जायन्टव्हील अलगद

वर्कन फिरते तेव्हा उत्तरेस बघत राहावे
प्रश्नासारख्या लांबुळक्या चेहऱ्याने.
पूर्वेच्या पश्चिमेला कोणती दिशा असते

मनाशीच ठरवावे. मुलाच्या खांद्यावरती
हात ठेवावा. त्याने धीर येतो. आणि मुलगाही
अधीर होऊन इथे तिथे वाकण्याचे टाळता

आणि पाळणा जेव्हा खर्कन मातीला
भिडतो तेव्हा खेकड्यासारखे हातपाय
आत आत ओढावे : चपलेच्या फाटक्या

निमित्ताने. जायन्टव्हीलमध्ये मुलाबरोबर
बसताना आकडे मोजावेत. म्हणजे वेडेवाकडे
विचारसुद्धा सडकेसारखे सरळ होतात.

जायन्टव्हीलमधल्या रुमालावर, विसरलेल्या,
पाणी सोडावे. तरीही जायन्टव्हील स्वप्नात
आलेच तर—
रुमालासाठी, डबडबलेल्या, कपाळ शोधावे

## स्वप्ने पाहतात

स्वप्ने :
स्वप्ने पाहतात
रक्तामासाचे अर्धजागृत पुतळे
निरागस अर्भकाचे
निर्हेतुक हसू आणि
शाळकरी पोराचे
छडी चुकवणारे भाबडे आसू

स्वप्ने पाहतात
गोऱ्यागुब्ऱ्या तांब्याच्या मांड्या
सुटलेल्या चोळीची
अनिवार तडफ आणि बळकट
दंडातील डुक्कर-मुसंडी काम-जरब

स्वप्ने पाहतात
म्हाताऱ्याचे निद्राधीन सताड उघडे डोळे
शुक्राप्रमाणे सांज-पहाटे निस्तेजणारे

वाटते
एक होऊन डोळस स्वप्न
पहात राहावे
काळोखाच्या प्रस्तरात निद्रेने कोरलेली
रक्तामासाची अर्धजागृत
सेकंदमयी शिल्पे

माझ्या स्वप्नाने घालावी भीक मला
पारदर्शक क्षणभंगुर स्वप्नाची
सुजाण शिल्पकाराच्या दैवी
नेत्र-स्पर्शाची

## स्तब्ध स्तब्ध पापणीत

स्तब्ध स्तब्ध पापणीत जत्रावळ दिवसाची
काजळल्या दाहि दिशा सुन्नसुन्न आसमंत
वळिवाची अवचितता घेउन ये निद्राघन
अजगरल्या गात्रांवर सुस्तीचे चढत कवच

पायांना त्राण नसे बळ न उरे फिरण्याचे
मानेचा ढळताना तोल झुके बन काळे
बन काळे निबिड कृष्ण अवसेपरि गर्द गहन
स्वप्नाच्या बीजातून फोफावत फुललेले

सोन्याहुन मोहमयी ही वेळा लुटण्यचिा
चिंतेच्या खाईवर स्वप्नबाग बघण्याची
स्वप्नबाग बघताना ळोळासम चंद्र दिसे
.... ताटव्यात झेंडूच्या वणव्याचा डोंब उठे

शिल्पापरि घननिद्रा पापणीत येइल का ?
स्फटिकशुभ्र रात्रीला गुरफटून घेइल का ?

## माझा सूर गिरवणारा

माझा सूर गिरवणारा एक रातकिडा
खबदाडी एकांतात ऊर फोडून
अणकुचीदार सुईने अविरत

सतत पोखरत बसतो अवाढव्य
भव्य मर्मरंध्राएवढे भगदाड
ज्यांतून जाणार असतो डुलक्या

दुडक्या औटकी-अवजड गतीने
उंटांचा क़ाफिला, ल्हा....ल्हा....करणाऱ्या
तृषार्त जिभा हपापलेल्या हातभर

बाहेर काढून हिरवळीकडे....हिरव्यागार
ताड-पर्णांच्या सुखलोलुप वावटळी
छायेत कवडशांची चंद्र-खांडोळी

पाहण्यासाठी.

## चित्र

मेजावरती पडे लिफाफा
आणि तयावर चष्मा फुटका
तिरक्या चिरक्या अक्षरांस अन्
खदखद हसतो दिवाणखाना

कोट वयस्कर उमगुन सारे
निमूट बसतो हँगरवरती;
हळवा भोळा परंतु सदरा
दांडीवरचा पेच न सोडी

— छातीवरती बसते आशा
आणि निराशा पाठीवरती

## नुकते कोठे उमलू लागले आहेत

नुकते कोठे
उमलू लागले आहेत
कवडशांचे कळे, धम्मक पिवळे
डेरेदार वृक्षांच्यां पायघोळ सावल्यांत
कोसभर लांब उभी आहे
अजून गुलबक्षीची पहाट
आणि ही पायाखालची मध्यान्ह
कोडे करणाऱ्या कुब्जेप्रमाणे
खिळून बसली आहे नखे रोवून
अबोलीच्या ओठावर कुसुंबी संध्या
विर्घळताना ओल्या
तुझ्या माझ्या मोहोळाप्रमाणे
ओघळतील सावल्या....म्हणून.

## इथे असा आज एकटा बसून

इथे असा आज एकटा बसून
पाहतो आहे मी भिंतीच्या त्रिकोणात
जगड्व्याळ पसरलेले कोळ्याचे जाळे

जणू सूर्यकिरणांच्या सहस्रशलाका
बंदिस्त केल्या आहेत काळपुरुषाने....
ऐतिहासिक घटनांचा शब्दबद्ध तपशील

ऋषींची गोत्रे....गोतावळ्यांचे आराखडे....
वंशवृक्षाचा उलगडणारा वटवृक्षी फापटपसारा
खोल खोल जमिनीत शिरणारी
रुजणारी पाळेमुळे

....पारंब्यांची पणतवंडी टोके
आजीच्या मानेवरती लुडबुडणारी
अजाण अर्भकांची लवचिक बोटे....

इथे असा आज एकटा बसून
पाहतो आहे मी तुझ्या नकारातली नागवी
निश्चिती क्षणकाल विसरण्यासाठी

पाहतो आहे मी कुणासाठी न थांबणाऱ्या
काळाची कळसूत्री किमया....बेंबीची दुनिया.

## माझे मन बहरते

माझे मन बहरते कळीकळीत ठिपकणाऱ्या
वसंतासारखे औषधी रसायनागाराच्या
नळीनळीत....बोगनवेली पिवळ्या आणि

शेंदरी आणि चंदेरी नळकांड्यांतून उतरतात
जे विचार निवळीप्रमाणे घाण निवळून
स्वच्छ नीटनेटके चकचकीत
मार्बल-टाइल्ससारखे

झगझगीत त्यांनाही चिकटतात ओंगळ
नायट्यासारख्या शुष्क, सचेतन श्रमजीवी
चिंता, वर्गकलही विफलता....सतत मी जळत

राहतो धुमसत. पहात धुरांड्यातून
कोसळणाऱ्या कडेलोटी लोट लोट धुराकडे
औषधी रसायनागाराच्या, स्वच्छ नीटनेटक्या,

बोगनवेली पिवळ्या आणि शेंदरी आणि
चंदेरी नळकांड्यांतून भरकटत लॉनवर,
ठाण मांडून, हिरव्यागार, तडफडत राहतो.

# ही तर माझी अन्नदायिनी

या चिमणीच्या टोकापाशी
धूर गुरफटे स्वतःभोवती
थरथरते अन् प्रचंड वास्तू
वृक्षसावल्या हिरवळ खाती

पत्र्यांच्या राशीवर चढते
विटकररंगी कीट-विराणी
कॉम्प्रेसर अन् रातकिड्यासम
तोडुन जोडी तान तराणी

मान उंचवुन क्रेन जिराफी
वंगणलेले उचली सुळके
विहिणीच्या तोऱ्यात सदोदित
फोर्कलिफ्ट धावे इकडे तिकडे

सभोवतीचा सिमेंट-रस्ता
ट्रक-भाराने चिडे मनस्वी
ट्रॅन्सफॉर्मरचे व्रतस्थ पोळे
तटस्थ बसते जसा तपस्वी

आत जिण्याची धडधड चाले
तंद्रीतच गरगरती चाके
हात अधाशी तसे उपाशी
मिनिटांचे मारतात टाके

पळापळाने कलाक सरतो
सायरनचा सैलताच विळखा
पाय घराला खेचत बसती
चाळविती कुणि विचार जळका

ही तर माझी अन्नदायिनी
इथे जन्मती नवीन नाती
धूर बोचला डोळ्यांना तरि
गुरफटणे पण स्वतःभोवती

## गुलतुरा

कललेल्या उन्हाच्या डाहळीवरचा
गुलतुऱ्याचा तांबुस पिवळा
झुबका
खुडण्यासाठी तू जेव्हा उंचावतेस हात
तेव्हा मीच होतो गुलतुरी झुबका
ते तुला कळत नाही, पटतही नाही
सहा वेळा तुझ्या ओठांना चुटपुटत
स्पर्श करणारा भरघोस झुबका हातात
येत कसा नाही? असेल विचारायचे
तर विचार त्या समोरच्या डोंगराला—
चिकटलेल्या
मेघाला....मेघाचा डोंगर होण्याआधी

## जास्वंद

फुटे पहाटेला डोळा
ओठ-पोवळी मेघात
निद्राधुंद जास्वंदही
चूर साखर-स्वप्नांत

....तोच चाळवली झोप
डोळे चोळते चोळते
एका घोटात अवघी
गिळू पहाट बघते

## दिवस जेव्हा मागे मागे

दिवस जेव्हा
मागे मागे जाता जाता
डोंगराच्याहि पार मागे जातो
आणि पसरतो
सुतकी, उदास संधिप्रकाश.
नाक कान उडालेल्या भग्न-भयानक शिल्पाप्रमाणे
मेघ बनतात भयाण;
सावल्याही भेदरतात, पळत सुटतात
घोळक्या घोळक्याने; तारा वाहणाऱ्या एकलकोंड्या
वीज-स्तंभाचीही उडते बोबडी
पक्षी दिसतात उडताना स्तब्ध
....विमाने लाकडी
लोखंडाची छातीही बनते हलकी फुलकी
अशा वेळी
अंगठ्यावरच्या टिचभर नखुरड्यालाही सुचतो
रातकिड्याचा छाती फोडणारा अथांग आक्रोश.

## हा शरद चांदण्याचा

हा शरद चांदण्याचा उबदार हिमसेक
चिडीचूप बसलेला हा आसमंत निवांत
हा डोंगर
फिओर्डप्रमाणे चिंचोळा, पाण्यात उतरणारा
दूर....दूर....वाऱ्याला फुटलेला
हा शुभ्र-भोर पंखाचा पडाव
गळ्यात गळा घालून बसलेल्या
तुझ्या माझ्या शिल्पाने
पुरे झालेले हे चित्र
निसटत्या निमुळत्या यौवनात
गुल्मोहराची आर्त सुरावट ऐकून
पुन्हा पुन्हा पहावेसे वाटते.

## रात्र जाते प्रत्येकाच्या

रात्र जाते प्रत्येकाच्या डोळ्यामधून
प्रत्येकाच्या वयाप्रमाणे वकूब बघून
कोवळ्या अर्भकाच्या डोळ्यामधून जाताना
तिला पडत नाहीत प्रयास, फार श्रम;
ती होते एक भला मोठा अगडबंब
हत्ती, डुलत डुलकत चालणारा
चाल त्याची दुडुदुडु आणि पायांत
साखळदंडी घुंगुरवाळा.

प्रेमी युगुलांच्या डोळ्यांत शिरताना ठरत
नाही ती संकोचाने
बिळात घुसावा उंदीर तशी पण स्तब्धपणे
उडावा तोफगोळा अलगद पाउल न वाजवता

रात्र घुसते म्हाताऱ्याच्या डोळ्यांत
अडखळत गडबडत लोळत........
स्थूल गर्भार कासवीण रेतीवरून चालावी
बदक् बदक् तशी स्लो मोशन फिल्ममधली
पाऱ्याची उडालेली चिळकांडी अशी.

माझ्या डोळ्यांमधून जाताना रात्र विसरते
भान, विसरते वय, विसरते काळ
सुईच्या नाकात शिरावा दोरा तशी
ती जाते अलगद अडखळत
कधी क्षणार्धात....कधी दोन तीन तपांत.

## नकाशा

विनाळाटांचे सपाट सागर. सुरवंटासारखे सरपटणारे
केसाळ डोंगर; उगमात विरणाऱ्या नागमोडी नद्या. लाल निळ्या
रक्ताभिसरणी लोहमार्गी रेषा. देशादेशांची रंगाकार मेघखंडी
अभिलाषी भाषा....सारेच कसे चपखल बसलेले दाटीगर्दीने
अक्षांश–रेखांशांच्या सर्कशी मृत्युगोलात चिडीचूप निमूट.

अचानक जाग येणाऱ्या ज्वालामुखीप्रमाणे नकाशावर
जागा होतो एखादा देश. रांगता रांगता हळदमाखल्या अंगाने
मांडू लागतो
स्वतंत्र शेज. इतर देश कसेबसे दाटीदाटींने बसू लागतात, तेव्हा
रंगारंगांचा गलका अधिकच वाढतो....ढकलला गेलेला
सागरकाठचा देश पाण्यात पडेल वाटते....
....होत नाही काही. फक्त भयाण सामसूम दाटते.
शिळ्या कढीची पाळ फुटेल केव्हा नि अणुछत्रीचा लोळ
उठेल केव्हा, काही कळत नाही. थांग लागत नाही. अथांग
सागरतळाप्रमाणे नकाशा मात्र संथ शांत निद्रिस्त असतो.

## स्वप्नांनो आणि सत्य घटनांनो

स्वप्नांनो आणि सत्य घटनांनो
तुमच्या मार्गावर मी कधी उभा नसतो
तुम्ही वळता तिथे वळत नसतो
तुम्ही पाहता ते पहात नसतो
वहातहि नसतो तुमच्यासारखा अनिर्बंध अनिकेती कैफात.

तुमचा मार्ग निराळा माझा वेगळा
तुमची दुःखे निराळी माझी वेगळी
तुमचे ईप्सित, तुमचे इंगित, तुमचे हितगुज कुजबूज
सर्वच वेगळे
तरीहि तुम्ही माझा पाठपुरावा करता
पोलिसी जोषात खडे राहता
हातात घेऊन कड्याकोयंडे
मला चालू द्या माझ्याच आड अथवा अनाड मार्गाने
मला नको तुमचा स्वप्निल शिडकावा
शीड टरकावून नौकेची वाताहत करणारा
मला नको तुमचा जहरी तोडगा
नको नको म्हणताना डोहाळ्यासारखा घशात उतरणारा,
जराही वळू नका माझ्या आसपास
रस्तेही फिरवू नका माझ्या पुढचे चक्र प्रकाशलेले
चकव्यासारखे गुंतवून ठेवू नका मला
पाण-भोवऱ्यात रुतणारा असाहाय्य बिंदू जसा
खोलावणारा....

स्वप्नांनो आणि सत्य घटनांनो
मला नाही विस्मय-अचंबा तुमच्या जहरामृत-योगाचा
कुठल्या पंचांगात ठाकली असेल ती योग-युती
असूद्या तिथेच तशी
जशी उपेक्षित कविता अक्षरात खितपत पडलेली
आणि तरीही यायचेच असेल तर या
सामोरून अकस्मात
जा गोठून माझ्यात, एकजीव होऊन बसा
स्वस्थ अस्वस्थ
हसा फक्त म्हणत म्हणत हा हंत हंत

स्वप्नांनो आणि सत्य घटनांनो
आपण तिघे राहू
दत्ताच्या सजावटी पुतळ्यासारखे
युगानुयुगे
निःस्तब्ध निर्विकार तिच्या शयनागार त
असूयेने विद्ध

## मत्स्यालय

एखाद्या नाट्यच्छटेसारखी
ती गुणगुणत बसते स्वतःशीच ओवी अथवा
वहीदा रहेमानच्या तोंडच्या लताच्या लकेरी
तऱ्याच्या परिघात वावरताना
ती विसरून जाते कॉलेज-डे .... क्रिकेटची मॅच
उल्हास-काठचा पिकनिक-स्पॉट
टेबलावरच्या मत्स्यालयाकडे तिची नजर जाते
आणि माशांची कलावतू गुणगुण
तिच्या डोक्यांत किणकिणू लागते
म्हटले तर हे सारे अचानक घडते .... म्हटले तर—
का होते ? कसे होते ? हे तीसुद्धा विसरू बघते
तऱ्याच्या परिघात सरावाने वावरण्यासाठी
कधी तरी ती एकटी एकटी पहात बसते
कॉलेजमधला नाट्यशाखेचा ग्रुपफोटो. दोन जुळ्या
ओठांवर तिची नजर जाते. तेव्हा तिला एक
शीळ ऐकू येते .... मत्स्यालयाचा अहेर आवडला का ?
कुठून तरी शब्द येतात तेव्हा चपापलेली ती
तऱ्याच्या परिघात सावरत सावरत वावरू लागते
तऱ्याच्या परिघात सावरत सावरत सतत सराइतासारखी
ती वावरू लागते आणि मत्स्यालयातील मासेही
सतत गुणगुणत बसतात. एखादा मरतो. अनेक
जुळे तिळे होतात. म्हटले तर हे सारे अचानक घडते....
म्हटले तर .... का होते ? कसे होते ? हे तीसुद्धा विसरू
बघते. तऱ्याच्या परिघात सरावाने वावरण्यासाठी....

## असे अस्तावणाऱ्या सूर्यासारखे

असे अस्तावणाऱ्या सूर्यासारखे
सरळ पुढे पुढेच जाताना एकदम आड
वळणे
आणि पिंडीला वर्तुळताना बुज् पाहणारे पाऊल
तसेच दामटणे
या तिच्याच लहरी स्वभावाच्या एकदोन
वेलांट्या
त्यासाठीच मी ठेवली एक फुली
तिच्या संदर्भावर हिरव्या हिरव्या
स्वस्तिक होण्यापूर्वीच
आरती जशी
अर्धरिती
अशी.

## श्रवणबेळगोडा

श्रवणबेळगोडा
साठ फुटी दगडात कोरलेला
भीमकायी पुतळा !
डोके याचे रिकेट्स झालेल्या मुलासारखे
नि हातपाय ताडाएवढे प्रचंड लांब
हवे तर म्हणा याला महामानव
अथवा रोगण-रसायनांत जतन केलेले
गलीव्हरचे शव.
तंटा लढाया नकोत
म्हणून हा इथे डोंगरकड्यावर
एकटाच ध्यानस्थ उभा
उद्या फॉलआउटची ठिक्करठार लढी
पाहताना ठेवताही येणार नाहीत
या अभाग्याला डोळ्यावरती हात
कानावर खडा आणि ओठावर 'चूप रहा'
टेबलावरच्या पेपरवेटी माकडांसारखे.

## त्या रित्या रित्या तृप्तीचा

त्या रित्या रित्या तृप्तीचा
आक्रोश मारतो डंख
केसांत पेटला वणवा
तिरिमिरीत धावे भांग

श्वासावर वाहे श्वास
अस्वस्थ उसासे वारा
का पंख शिडाला फुटता
मचव्याची खचली आरा

डोळ्यांत थर्थरे राग
पडसाद उमटला गाली
की सांज ढगांची छाया
मातीत मिळाली लाली

स्पर्शाचे बोट धरावे
घडि सरळ करावी सारी
हर्षावर कोसळलेली
नागांची युगुल-मुजोरी

मी हजार पुसले प्रश्न
हुंकार उत्तरुन आले
ओठात सांडले शब्द
मौनात बोलके झाले

क्षण असा ठिगळता....थिजता....
कुणि दौडत न्यावे घोडे
मिनिटांचा सुटेल पीळ
शतविद्ध मनाला वाटे

मिनिटांचा चुकता ठेका
मध गोठे उधाणलेला
आकाश गिरवते....पुसते....
परि कुरळ्या पंख-भराऱ्या

## मशरूम

परसदारी दुर्गंधीच्या वळचणीशी
पाचोळ्याच्या निःस्तब्ध निवांततेत
उसासत पडलेल्या उघड्या नागड्या
लाकडी ओंडक्यावर
कधीतरी अचानक उमलते
पफ्‌ची मशरूम
लाज-गुलाबी रंगाची
कोंभ-कोवळ्या अंगाची
रक्ताचे रक्तचंदन करणाऱ्या
सायनाइडच्या जिभेची
कधीतरी पडणाऱ्या तुझ्या स्वप्नासारखी

# काँक्रीटचे क्रॉसवर्ड

झपाझपा चढत भरत जाते इमारत वर वर वर. भरगच्च
सिमेंटी वास्तव. पराचीचे सांधे करकरतात. दुखतात
थोडे सुजतात. हाडांत धुमसणाऱ्या संधिवातासारखे
चुरचुरतात. सुंभाचे स्नायू अधिकच घट्ट होतात. अधिक

आवळून घेतात डुगडुगणारे बांबूचे क्रॉसवर्ड. एक फळी
लोंबकळते विळीसारखी. लंबकासारखी झुलत झुलत
राहते धुळीने भरून. आता पडेल, मग पडेल....प....प....प....
पडत नाही खाली अबाधित राहते तिच्याखालची उताणी

अस्ताव्यस्त पसरलेली तरतरीत पिवळीशार चोळी.
मिक्सर गरगरत थांबतो. पुन्हा दुशी मारतो....गरगरतो.
गिलावा चाटतो. एक बकेट धप्पकन पडते. धुळीचे कारंजे
उडते. कवायती सफाईने रिते रिते होत जाते एकेक पोते.

बगळ्यासारख्या आरोळ्या घालत ठेकेदार येतो. बडबडतो.
काजव्याची तरतरी पायापायांवर पेरतो. गुरगुरतो.
ठणठणतो. अचकट विचकट अगम्य भाषा....डोळ्यांत
नशा लालसर बुबुळे बुडतात निवांत बसलेल्या चोळीत

पिवळ्या. सिमेंटमाखल्या हातांनी वर वर जाते चिप्प चेपलेले
घमेले. एका हातामधून दुसऱ्या हातात. तिथून पुन्हा आणखी
वर तांबड्या चोळीकडे....माझे डोळेच बनलेल्या हिरवीकडे
थोडे खाली. सरळ कर्णरेषेत नारिंगी....तिथून पलीकडे डावी

माझ्या दुखऱ्या मानेला पिरगळून निळ्या तरतरीत....पुन्हा वर
हाकेच्याहि पल्याड वर....टोकाच्याहि पुढे जिथे माझे डोळे
जातात न जातात तोच पुन्हा धप्पकन सूर मारून सरळ
वेडे वाकडे जमिनीवर क्षणभर नि पुन्हा क्रॉसवर्डमधून वर वर
वर.

## रोलिंग करणारा एक इटुकला

रोलिंग करणारा एक इटुकला कॅनरी
सतत पाच मिनिटं त्याच्या गळ्यात
गितारते विलापिका....विषण्ण आलाप
कुठल्या खोल खोल आठवणी उठतात
दुखऱ्या सुरांत विव्हळ व्याकुळ पोळलेल्या
अशा. आणि निनादत राहतात
सप्तसुरांची सत्तर कंपने
पिंजऱ्याच्या उभ्या आडव्या अक्षांशरेषा
व्यवहारी रोखठोकतेत प्रकंपतात स्तब्धपणे
पसरतात खोलीभर सूर....सूर....
जसा काहूर काहूर उठवून वारा
डवरलेल्या गुलमोहरांत गुलाबपाकळ्या झालेला
कळायला हवी एकदा तरी मला याची व्यथा
जीवघेणी कथा.
डवरलेल्या गुलमोहरात होरपळून गेलेली
प्रतिबिंबी गाथा.

## मजबूत मनाच्या चिरेबंदी

मजबूत मनाच्या चिरेबंदी स्तंभामधून
केव्हा तरी ठणकलेली
अशाश्वताची जीवघेणी कळ
ढासळलेले मनोरथ भिंतीवरच्या पोपड्यांप्रमाणे
एका उबळीने प्रबळलेली जराबळ
आहारलेल्या गिधाडाचा तोंडावर थकवा
अवखळ वाहणाऱ्या नसानसांत
संथलेला रक्तौघ
मधूनच मूठभर चमकलेले आशेचे काजवे
सलाइन इंजेक्शनच्या ट्यूबोळ्याचे,
हॉस्पिटलचा उग्रट वास, विसवणारी
नर्सची हसतमुख हालचाल
विचकल्या पावलांना कळलेली
ऑपरेशन थिएटरआडची चिरफाड
त्रयस्थतेचा अगडबंब पहाड
आड ठेवून मी पाहिली थर्थरत्या परदुःखी शीतलतेत

## पूर्णविरामापलीकडे

पूर्णविरामापलीकडे
पसरलेली शांतता
तिचा कानोसा
घ्यावा कसा ?
आणि उजळलेल्या दिव्याचा
प्रकाश-कंगोरा
या डोळ्यांना
दिसावा तरी कसा ?
जिथे सोस आहे जगण्याचा
जीवन, जगवुडीआधी
आणि व्याधी
पावलापावलांवर किंचाळत
असताना
पूर्णविरामापलीकडे
पसरलेली शांतता
तिचा कानोसा
घ्यावा कसा ?
आणि उजळलेल्या दिव्याचा
प्रकाश-कंगोरा
या डोळ्यांना
दिसावा तरी कसा ?

## नगण्य गोतांशीसुद्धा

नगण्य गोतांशीसुद्धा
जुळवून जुळवून घेत आलो. टरकू दिले नाही
वीतभर जीवन. शब्दांनी
तोंड सोडण्याआधीच केले आचमन.
संतापलो कधी मनातल्या मनात
कोळसा धगधगण्याआधीच
शिंपडले गुलाबपाणी सांत्वनाचे
जुलाबदाणीतून.
अकस्मात उठणाऱ्या वादळात
ठिणगी पडण्यापूर्वीच पसरवली
शांतता. दोन हातांनी माघारीची,
पलंगपोस अंथरावा तशी.
जपत जपत वासनात जीवन ठेवून
पहात राहिलो गळणारे पावसाळी आकाश
उन्हांनी फक्त वेडा समजून
घरे बांधली शेजारी पाजारी
प्रतिध्वनीचे दुय्यम स्थान स्वीकारून
जगता जगता चरित्र भरले.
जिथे शब्द उमटले नाहीत
तिथे मौनाचे गदारोळ घुमले.

## सावट

पसरतात जेव्हा सावल्यांची झाडे
मध्यान्हीला धुळीत पसरट. प्रदर्शनात
पाहिलेल्या आरशामधली प्रतिबिंबे
खुजी उलट सुलट बसकट....तेव्हा
सुट्टीची सुस्ती डोळ्यावर पेंगत असते
नि तू बसतेस विणकामाच्या घरगुती परिघात
तुझ्या अम्ब्यावरची फुले उमलू लागतात
तेव्हा झाडेच सावल्या होतात....अशी सुट्टी
संपते डुलकीसारखी बघता बघता नि मग
मनभर पसरते नव्या झपाट्याने झेपावणाऱ्या
आठवड्याचे डोंगराएवढे बटवडी सावट.

## ऑर्किड

तिला मी रोजच पाहतो
लाकडी नरसाळ्यात प्रयत्नपूर्वक जोपासवलेली
ऊन कवडशांच्या थेंब थेंब सिरपवरती वाढवलेली
तिच्या सेल्फकंटेंड ब्लॉकच्या ग्लास-हौसमध्ये
ऑर्किडसारखी जपवलेली.

आणि तीहि ऑर्किडसारखीच रंगीबेरंगी फुलते
फुलपाखरांच्या पाकळ्यांसारखी
तिच्या एका पाकळीने तिच्या गालावरचा कुसुंबी रंग
टिपलेला असतो.
आणि दुसरी पाकळी माव्ह रंगाची तिच्या साडीसारखी असते.
तिसऱ्या पाकळीवरची छटा वाटते सोन-केशरी, राजवर्खी
तिच्या वक्षासारखी मी न पाहिलेल्या....

मी तिला इतके नीट निरखावे असे परकेपण
आमच्यात असते—तेच जवळीक सांधते
कधी कधी तिचा नवरा दिसतो
सुकलेल्या जीर्णशीर्ण वृक्षासारखा टकली,
नकली दात लावणारा
त्याला बिलगून बिलगून ती चालते तेव्हा मी तिच्या
ऑर्किडी-बांडगुळी जिण्याची कीव करतो
कधी तरी एखादा इरसाल विचार तिच्याविषयीचा
मनात रुजवतो
आणि धुमसवत ठेवतो रात्रंदिन वणव्यासारखा, विझलेल्या.
खोलवर मुळे रुजवून मातीत ती उभी राहील
आणि घटपर्णीसारखी, उनाड वृक्षाला
ताडासारखा सरळ करील
तर मी कशाला तिच्याविषयी इतका विचार करीन ?

तिच्या ऑर्किडी जिण्याची कीव करता करता
ती माझ्या अंगा-खांद्यावर, मनाच्या माळावर फुलत असते
तिला आधार देणारा मीसुद्धा एक
टकली, नकली जीर्ण शीर्ण रुक्षवृक्ष होतो.

## भडभडून कोसळेल

भडभडून कोसळेल भरून आलेले आकाश
आणि रिते रिते होतील जंतरमंतर ढग
झाकोळून आलेले आसमंत विलक्षण दीप्तीत
उजळून निघेल
सुसाटत सुटतील पाण्याचे निचरा-लोट
गटारांची तटतटलेली पोटे सैलसर होतील
आणि पन्हेळींचे धुरकट धो धो धावणारे
धबधबे रोडावतील
थबकलेला मुकाट रस्ता पुढल्या टप्प्यावर
गोंगाटत बागडत पावले टाकू लागेल....जसे
आपण दोघे, किल्मिषांची सर
आपल्या आगे नि मागे

## पाऊस...प्रतिबिंबांचा पाऊस

पाऊस .... प्रतिबिंबांचा पाऊस तिच्या डोळ्यांच्या डोहात
बल्ब फुटून उधळलेल्या प्रकाश-शलाका हलत्या, हिंदकळत्या
उसळत्या रंगीबेरंगी कलाबुती लहरीत मिटत मिटत....
तळ्याकाठच्या, सरकत्या, थरकत्या उलट्या प्रतिबिंबांसारख्या

सरत्या सायंकाळी तिच्या रोमारोमात पसरते, पेटते पहाट
निऑन-ॲड-साइन्सच्या बिंबांची डुचमळत्या पाण्यात लाल लाल.
आणि मध्यान्ह दुपारी राजवर्खी तिच्या वक्षावरचे कामहर्षी
उतू जातात शेंदरी सूर्यास्त पसरत्या प्रकंपत्या लहरीत गात्रांच्या.

फिक्या उन्हात भिजणारा श्रावण-शिर्वा डोकावताना
जाग्या होतात तिच्या सुकलेल्या आठवणी हिरव्यागार
हलकेच अंगावरून पसरते एखादी काळसर सावली पक्ष्याची

चिरत चिरडत जाते लाटालाटांत जसा तरंगता अंधार मेघाचा
आणि उरतो रक्तजांभूस तवंग. मी अपंग मसलदार
पुतळा होऊन पाहतो काठावरून कंगोरी थर्थरत्या शहाऱ्यात

## केस विंचरून सुटत नाही

केस विंचरून सुटत नाही आयुष्यगुंता
सहजगत्या निसटतात कचाट्यातून गुर्मिळ क्षण
आणि चिमटीत सापडते एखादी ऊ अथवा
डँड्रफचा हलका फुलका खाजाळ ढलपा

काळ अधिकच सोकावल्यासारखा वाटतो
करकरा केस खाजवणाऱ्या भिकाऱ्यासारखे
आयुष्य वाटते बसले आहे थबकून हबकून
निलाजरेपणे रस्त्यावर कडेलगत रडतखडत

मनाचा कोंडमारा केव्हा होतो, कुठे व्हावा
नियम ठोकताळेही बांधता येत नाहीत सलगपणे
ठामपणे जशा कुंडलीत बसलेल्या शनिमंगळ
आणि इतर खग्रास्ती ग्रहांच्या बोभाटी वसत्या

कुणाची कुचंबणा कुठल्या वळणावर व्हावी
कुठे पडावे मीठ पांचट आणि अळणी
सांगावे कुणी — एकवीस गोळयांचा वसा
चुकल्यावर सर्जनने म्हणावे — बसा

तसा छद्मी हसत हसत काळ फक्त पंख
पालवत मालवत मालवत जात राहतो.

## दूरदूर गावाबाहेर पुस्तकाबाहेर

ओळींतल्या जोडाक्षरासारखी डोळ्यावर आपटगारी
टेकडी आणि करकरीत कोरी निळीशार निळाई
वरवर जाणारा धुराचा विरोळा फुल्क्या विचारांचा
गावाभवती नदीचा जस्ती वळसा हल्क्या लकवीचा

वस्तीमधून बाहेर पडणारी निष्कर्षी मळवाट
अलवार दगडाशी सांडलेली अर्थसघन सावली
शिशवी जघनासारखी आणि इथेतिथे आता घणघणाट
घंटानाद चर्चवेळची ललकार गळघंटांचा किणकिणाट

विस्कटलेल्या विचारांसारखा उधळलेल्या कंळपामधला
मी तर बनलो आहे घुमटाएवढी अवाढव्य घंटा.
शब्द शब्द स्तब्ध स्तब्ध पुस्तकांत जसा की बहिरट
रहदारीच्या परार्ध कर्णछिद्रांत फायरब्रिगेडी पळपळाट

दूर दूर — गावाबाहेर नदीपल्याड स्मशान मात्र चितेत चूर
बुक-मार्कासारखे ओठ आवळून कलेवरी नीरवता पांघरून.

## सततच तिच्या घराभोवती

सततच तिच्या घराभोवती असतो चौफेर
बहरलेला बोगनवेलीया. फुलपाखरांच्या कळ्या
किरमिजी भगव्या, फिकट जांभळ्या गोंदाने डकवलेल्या.

कुत्राही तिचा गुरगुऱ्या कातलेल्या लोण्यासारखा
दिसतो. ग्लुको-मोनॅको, क्राफ्ट चीज अथवा हाइक
चघळताना. वीतभर उंचीचा, फताड्या नाकाचा....

खोल खोल संदर्भात शिरायचेच असेल तर–
कुत्र्याच्या नको. कुंपणाच्या कशाला ? थेट आत
कोनाडी अयन्यात, वॉर्डरोबी मखरात, टॉपलेसी

नखऱ्यात, रूजच्या लालीत, डोळ्यांच्या निळाईत
केसापाठच्या तेलरड्यात शिरायचेच असेल
तर दबत दबत विचार न करता हवे डुंबायला

तळीद-राल्या पाणबुड्याच्या कैफात....आणि
किनाऱ्यावर परत येताना बळे बळे अनेक हवेत
मोती पोवळे निष्कर्षाचे उपसून आणायला....

इतरांना बेचैन करायला, स्वतःला सुखवायला
ते असतील तिचेच अश्रू मोत्यांसारखे थिजलेले
अथवा सांडलेल्या लाळेचे डिंक डिखळे. खरे–

खोटे हवे हुडकायला....
....धबधबाच होण्याआधी तिच्या केसांचा.

## तसे बरेचसे मोह टाळले

तसे बरेचसे मोह टाळले
बीर, ब्रँडीपासून इतर ' ब 'कार
आणि हातभट्टीची नवसागरी धार.

रेसच्या रिंगणाकडे वळलो नाही
सरड्याप्रमाणे बसून राहिलो कुंपणावरती
पवित्रे घेतले ते किरण वळवण्यासाठी

सांज-सकाळ क्षितिजावर तळपणाऱ्या
शुक्रतेजाळ कॉटनफिगरकडेही फिरवली
पाठ— सूर्यफुली निग्रहाने....संयमाने....

मला समजले या टाळाटाळीत सरकली
दुपार आयुष्याची चांदण्यासारखी
आणि जमेस उरला सांजवाती प्रकाश

तोही टाळण्याआधी म्हटले चाखावी चव
तिथेहि सवय आडवी आली. खेकड्याप्रमाणे
पावले टाकली. तीहि रंग-रूट-मार्च करीत गेली

## भिंतीवरच्या सूर्य-कोळ्याचे धागे

भिंतीवरच्या सूर्य-कोळ्याचे धागे
सूर ओसरलेल्या झंकार-तारांसारखे
स्तब्ध अबोल बहिरे
जलरंगी सतेज गहिरे.
कुणीही ढुंकून मान वळवू नये असे नगण्य नुसते
कधी तरी एखाद्या अमोघ क्षणी
त्यांच्याही अंगी संचारते वारे
सरकतो सर्कन कोळी
थरकणाऱ्या ज्योतीसारखा
होतो विषमकेंद्री
नि मग चमकत राहते गवाक्षाची नक्षी....
भिंतीवरची एकाक्ष तुळई
वेडीवाकडी लोंबकळणारी जळमट जाळी
म्हाताऱ्याच्या मेंदूवरच्या वासनांच्या बनतात हपापलेल्या रेषा
आज ना उद्या कसे टाळशील म्हणतात
आमच्या नकलादू दोरखंडांना
कसे ओसरत्या कायेला धरून ठेवशील म्हणतात
शिस्तशीर बसलेली चिरेबंदी कौलेसुद्धा
विचकट हसतात
त्यांच्या दातांच्या फटीतून चमकते सलग
विद्युत्-रेषा
ढिल्या दाढेत ठणकणाऱ्या ठळक सणकेसारखी.

# नाते

उनाड पक्ष्याने घातलेल्या कंप-कापऱ्या
आकाशव्यापी निनावी शिळेसारखी फिकट अंधुक
तिची-माझी मैत्री

मी नाही म्हणावे नि तिने रुसावे
असे उसासे कक्षेच्याही पार दूर
जिथे संबंधच दोघांचा कबंधी शिल्पासारखा

नाममात्र थातूरमातूर
आणि तरीहि कधी तरी, केव्हा तरी, कुठे तरी
व्यंग-पांगळी तिची धडपड मला करते अस्वस्थ

तिच्या पावलांत वाटते फुलारावी चाहूल
तिने धावावे वाटते क्षितिजतारेवरून....
मेघांची छत्री करून....
सर्कशीतल्या कर्कश कसरतीसारखे

नसतात मनात बेत, मनसुबे औरसचौरस काळेतिरळे
नाते माझे अनामिकेशी मीच जुळवलेले
चंद्रकिरणांसारखे स्पंजमोहोळी....चिंबकोरडे....

## शब्दांनो

लाख वेळा मी म्हटले
शब्दांनो.... थांबा
सहन होत नाही हा तुमचा
गोंधळ गलका

अणुगर्भातील संथ गोंगाटाहून
भयावह तुमचा हा दंगा
मौनाचा महापर्वत हलकेच
उलथवण्याचे तुमचे जुजबी कसब

अनाकाराला आकार देण्याची तुमची जिद्द
रूप तुमचे रंग-उधळत्या ताऱ्यांसारखे
तेजदार आणि ठिसूळ-पोकळ
देह तुमचा शिल्पाहून अधिक घोटदार

शब्दांनो
परिचयाचे आहे माझ्या
तुमचे सान्त परंतु असीम आकाश

आणि तरीही
कधी तरी माझ्याही मनात येतात
आपमतलबी मत्सरी विचार
वाटते
बंदिस्त करून तुम्हाला
ठेवावे तिजोरीत मोजून मापून

गल्ला जसा ठेवलेला तंतोतंत हिशेबी रकान्यात
आणि हवे तेव्हा, हवे तेवढे हवे तिथे

राबवावे ठिपकवावे तुम्हाला
वक्रनलिकेतील भाबड्या पाण्यासारखे

शब्दांनो
माझे हे विचार उतरतात न उतरतात
तोच तुम्ही उतरता विद्युत्वाहकातील विजेसारखे
बोटांच्या पेरांमधून थेट
हिमशुभ्र कागदावर बेट बनून ऐसपैस
आणि उठवता चार दोन वर्तुळे....
ती असतात तुमची छद्मी स्मिते
अस्मितेत बेधुंद झालेल्या गणितज्ञ
मानवाची उडवलेली टर

जरा घुटमळा
माझ्याही आसपास सतेज हसतमुख होऊन
मी पाहिले आहे तुम्हाला
निःसत्त्व व्हिटामीन टॅब्लेटप्रमाणे – जीर्ण जर्जर होऊन
माझ्या कवितेत वावरताना
जाळ्यात लोंबणारा शुष्क मेलेला कोळी जसा
तसे तुमचे अक्षरी सांगाडे
स्तब्ध बसलेले अचेतन माझ्या सभोवार
माझ्याही अंगणात फुलवा
तुमची सूर्य-वात
त्रिकट अवघड पूर्णविरामी पर्वत ओलांडून

शब्दांनो
फक्त एकच दिवस उजळा
खच्च अंधारलेली घुबडाची ढोली
अक्षरी दीपमाळेने.

दा. क्र. ५१०५
२३७३
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

## सी-साइड रिसोर्टमधल्या

सी-साइड रिसोर्टमधल्या स्मरण-पारदर्शी काचेतून खिडकीच्या
मी मारतो उडी किरण होऊन नाकतोडी
मी देतो ढुशी आरामखुर्चीच्या ऐसपैस सुस्तीला
निळ्या-हिरव्या लाटांच्या ललाटरेषा चाचपत चाचपत
मी लावतो आकडा....स्टेक....रमी....भरती-ओहोटीवर
मी हुंदडतो झावळ्यांच्या मोरपिसाऱ्यांतून चाळत चाळवत वारा
मी पितो प्रकाश काजव्यासारखा ओढत ओरपत
दमखोल श्वास

माझ्या नसानसांत
सागरगाज....तिच्या रियाजात माझे फुफ्फुसी पखवाज
खडक-दगडी दातांनी मी करतो रवंथ स्वप्निल समुद्रफेस
मी मोजतो टरफुली शिंपले....जवसफुली खवले....
किनाऱ्यावर भटकणाऱ्या भरकटणाऱ्या चकवी समंधासारखा
मी झपाटतो मलाच....पुसून टाकतो माझ्याच वाटा....पुन्हा पुन्हा....
जलभरत्या रेतीवरच्या पावलांत येऊन मिसळणाऱ्या....अडखळणाऱ्या....
माझे हातपाय डोलकाठी डुलणारे माड
माझी निवडुंगी बोटे करतात घायाळ
कॅलेंडरी चौकटीत दबा करून बसलेल्या तारखांना
जीभ माझी सूर्यगोली लाल लांबोळकी
लपकलपक चाटत राहते त्यांचेच काळेशार रक्त
सूर्यास्तभर पसरणारे
सी-साइड रिसोर्टमध्ये मी होतो बेभान
फ्रायडे भेटण्यापूर्वीच्या रॉबिन्सन क्रूसोच्या कैवल्यकैफात
करतो सुटीचे आचमन....संथ संथ

## सांजेच्या सांझरात

सांजेच्या सांझरात कधी तरी तरळणाऱ्या
सुतकी, उदास, उदी-करड्या
मेघासारखे मौन ओठावर बसते. ओठांवरच्या
वडबड्या मायक्रोरेषांत
चिप्प रेकॉर्ड चेपते
पर्युत्सुक पद्याने आटोकाट आवरलेल्या झेपेसारखी !

मौन : सुतकी ढगासारखे, ढगाएव्हढे
पाहिले मी एकदा जेव्हा अचानक ऐकली
वय-जुळ्या मित्राची अपघाती मरणवार्ता
भयकंपित झालो थंड थंड पुतळा
क्रॉसिंगवरचा हल्ल्यासारखा

....नंतर वाटत राहिले, वाटतच राहिले
गाडीखालून निर्भयपणे जाणाऱ्या पुलाखालच्या रहदारीसारखा
चालतच आहे अजून तो गर्दी होऊन....
गर्दीत मिसळून....
जे जे वाटत राहिले, वाटतच राहिले
त्यांचेच बनत बनत बनत गेले मौन....मौनाचे सरोवर
मौनाचा सागर....मौनाचा महासागर... अनेक
नायगरा-गिरसप्पांच्या सागरगाजेचा
पाचोळी कानोसा करून टाकणारे मौन.
नंतर पाहिली मौनाची सुप्त शक्ती....जनित्री पॉवर....
जेव्हा यथार्थपणे जाणवली
' शी मस्ट वीप ऑर शी विल डाय ' मधली
अवलक्षणी अलौकिकता.

मौनाचे महासागर– बोटभर आकाराचे
मौनाचे आकाश– खाचभर डोळ्यांचे
मौनाचे प्रपात– बहिऱ्या कानांतले
मौनाच्या भिंती....मौनाचे डोंगर...मौनाचे पर्वत....

सांजेच्या सांझरात कधी तरी दिसणाऱ्या
सुतकी, उदास, उदी-करडया
ढगासारखे मौन....
....गुहेएवढे धूत्कारणारे अबोल अवाक् मौन.

## टेट्रापॉड्स

झीज थांबव-थोपवणारे मनातले काँक्रीडलेले गुलछबू टेट्रापॉड्स
बसलेले असतात उन्हात अस्ताव्यस्त मैथुनमुग्ध
एक पाय दुसऱ्यात गुंतागुंतून तिसऱ्या कुणा खांद्यावर गुरफटून
दाटीदाटीने दावण-दटावणीत चालते यांची युगलमस्ती

आणि भरती धडकताना मस्त बाहू स्नायूंवर झेलत हे रोखतात
ढासळणारे किनारे ....मनातली वेल्हाळ-लेणी बदलतात
अनेक क्षणी कुणी परकरपरकी गौरगोमटी कुरळकुंतली
स्वप्नखुळी उसळमासळी मदनमंजिरी .... किती तरी तयार होतात
टेट्रापॉडांच्या मनात सावजसावल्या

हा झाला मनुष्यस्वभाव काय बिचकायचे याला बिचकायच्या
बुब्बुळबाहुल्या
एका चांदोबाआड अस्पष्ट विरळ दुसरे करवंदी झाड ठेवून
ठासवून आठवून लाटालाटांचे काठाकाठावर आघात-अपघात
सहन करीतच मोजायचे ऊनपावसाळे टेट्रापॉडणारे, इतकेच
हातात आपल्या.

## सूर्यफुली चेहऱ्याची कोळीण

सूर्यफुली चेहऱ्याचा सर्चलाइट फिरवीत बसलेली कोळीण.
समोर माशांची चवड. हिंदकळत्या हलत्या गोंगाटात डुलत्या
दिवटीच्या जळत्या दीप्तीमधून उजळणारे माशांचे निस्तेज
चंद्रास्ती डोळे. खवल्या-खवल्यांवर उमटलेली वर्तुळ इंद्रधनुष्ये
तेल-थारोळ्यात सडकेवर सांडणारी पेट्रोली जशी मोरपिसे.
सर्चलाइटी कोळीण कॉडलिव्हरी हिरीरीने फिरवते हात ममताळू
पाठीवरून माशांच्या वर्फगार. तिच्या गुबगुबीत तांबूस स्पर्शामधून

खळाळते वीज झळाळते डोळ्यांवरची नीज. मूर्च्छित मासे
दचकल्यागत बघतात. धस्त त्यांचे डोळे भुरळवतात .... संपतो
रुक्ष रोख व्यवहारी वायदा. थंड उजळत्या बंबाळात मी बघतो
हिमशिखरी मासे. केसातला केवडा. श्वासरिते कल्ले. ढगाळ वक्ष.
काखेतील ढग. बटबटीत डोळे. बसण्याची ढब. तुडुंबलेली रग.
नंतर ट्यूबलाइटी चांदण्यात तुझी कोळंबी बोटे यांत्रिकपणे
चिरू लागतात दक्षतेत मासे. तेव्हा मी झालेला असतो अजस्र
जाळ्याचे धूड लीलया दर्याभर फेकणारा आडदांड सागरसांड—
अनेक सर्चलाइटी सूर्यफुलांना सतत स्वतःभोवती परिघस्तवणारा.

## ब्लँकेटी एकान्ताहून खोल खोल

ब्लँकेटी एकान्ताहून खोल खोल आणि कुट्टमोर मनाची विवरे
एकेक विवर निधड्या छातीने वाचकरून पहावे हातात घेऊन
अंतर्मनाचे पलिते आत्म्याला संपूर्ण साक्ष ठेवून सतत उशाशी

मयसभेसारखा लखलखाटी इथला थाट आरस्पानी वाट. कोणार्क-
खजुराहोहून अप्रतिम नि जिवंत येथील अश्मविलास. नळराजाप्रमाणे
आपणच पहाव्या आपल्याच प्रतिमा दहा नग्नभग्न अवस्थेत

अनेक अनोख्या सहेलींबरोबर दगडबद्ध झालेल्या. कळत न कळत
आपणच चालवलेला आपलाच वासना-विकार युग्मउर्मीत आकारलेला

ब्लँकेटी एकान्त खोदून खणून काढताना घणघणते आपलीच चाहूल
चिचकते पाऊल, विचकट हसते छत, खदखदतो अलीशान एकांत
काभिन्न फत्तरांच्या भेडसावी घनछायांसारखी फडफडतात मनातली

लक्तरे, उबगतात अत्तरे, उडतात बुरसटल्या विचारांची वाघळे, सर्पटत
राहतात अतृप्त इच्छा. ब्लँकेटी एकांत ढासळून पडताना
उजाडते अवेळी
अळीमिळी गुपचिळी मॅनर्स, एटिकेट सभ्यशील मुखवटे लपतात
चेहरेचेहरे.

## समुद्र

माणसे वाढतात. वाढत राहतात
तरारलेले त्यांचे अवयव कालपरत्वे
शिथिलतात. गात्रे कोमेजतात. ओसरते
रग अंगातली. हटते अजाण कोवळीक

चेहऱ्यावरून, पडते अलगद गळून
गळलेल्या वर्षांबरोबर डागळून
कालातीत पानगळ अखंडपणे चालत आलेली....
....चालणारी....

वाढत नाही मात्र समुद्र. होत नाही तो
जीर्ण-शीर्ण. थिजत कोमेजत नाहीत
त्याची गात्रे. एका किर्र स्तब्धतेत सतत
तो असतो चूर. ललकारत स्वतःशीच
निरागस बालकासारखा. आजन्म बागडत रेतीत
तो होत नाही रिता. निघत नाही ढवळून
तळापर्यंत. दारिद्र्याने अवमानित
कर्म-कफल्लकासारखा. अथवा झुरतही नाही
ब्लडप्रेशरने खुरटलेल्या सुखासीन बैदुलासारखा
गप्पकन लाल-जर्द संत्र सायंकाळी
घशात घालण्याची त्याची खोड
अजून गेलेली नाही .... जाणारही नाही
होणार नाही तो माझ्यासारखा मोठा
वयस्क विमनस्क वयाने आणि मनाने.

शिकवला आहे बराच भूगोल त्याने मला
गोल असते पृथ्वी त्याने दाखवले
रामदास बोट बुडाल्याची दुःखार्त वार्ता
मी ऐकली प्रथम त्याच्याकडून
काठावर पहात असताना लपंडावी लाटा
एक लाट एक ललाट....दयार्द्र दर्या....
हा हिशेब नंतर समजला.

आता अस्पष्ट आठवतात
थिजलेले त्याचे निळसर डोळे
पाण्याने डबडबलेले
जसे जवसाचे फूल
तसा एव्हढासा झालेला चेहरा मलूल
आणि ओठ ओशाळलेले....

अचानक बऱ्याच वर्षांनी तो माझ्याकडे आला
मी होतो बसलो तुडुंब जेवून
आरामखुर्चीत सुस्ती पांघरून
पहिला पगार आणि सुट्टीचा आराम
मनाजोगे पुस्तक हातात.... 'दि ओल्ड मॅन
ॲन्ड दि सी....'
इतक्यात तो आला
आला आणि भरतीसारखा पाहता पाहता
अक्षरांच्या खडकाळात सजलमय झाला.

तो उमेदी म्हातारा, उसळणारा मासा,
जीर्णशीर्ण होडी, निळानिळा दर्या
निळानिळा म्हातारा, उमेदी मासा
उसळणारी होडी, जीर्णशीर्ण दर्या
मासा निळा निळा, होडी उमेदी
निळा निळा दर्या, निळा निळा दर्या, निळा निळा....

.... खडबडून जागा झालो मी गुंगीमधून
रागारागाने फेकले ॲशपॉट
माझा तो अगस्ती शॉट पाहून
खजील झाला बिचारा
निघून गेला पाय न वाजवता ओहोटीसारखा.

मात्र जाताजाताना पुटपुटला,
' आता तू झालास मोठा
विसरलास पूर्वीची सलगी

लाटांवरची दंगामस्ती हलकी फुलकी.
वाढत्या वयाबरोबर माणसाचे विचार
लहान लहान होत जातात.
मिटणारे वर्तुळ पाण्यात उमटलेले
थांबत थांबत थेंबावत
गंगोदक होते
तसे तुझे वागणे नि विचार नि आचार.
आता तू झालास मोठा.'

नंतर दिसला नाही तो मला,
मीही गेलो नाही त्याच्याकडे
मुद्दाम आपणहून आगंतुकपणे

कधीमधी त्याची निळीशार अंगकांती
डोळ्यांसमोर उभी राही. पण तिचे डोळे
जास्त निळे वाटत. तिची निळी निळी साडी
लाटांहून अधिक फेसाळे. तिचे अवखळ हसणे
तिचे लाडे लाडे बोलणे
रुसवे नि फुगवे.
मी विसरलो त्याच्या भरती-ओहोटीची
ऐटदार उसळण
तिच्याबरोबर फिरताना चटकन.

एका अपरात्री भास झाला.... तो आला
म्हणून दिवा लावला
पण तो नव्हता, निश्चितच नव्हता

कुणीच आले नव्हते, गेले नव्हते
फक्त दार करकरले होते
चुळबुळला होता पलंगपोस
सीलिंग-फॅनच्या स्रोताने समुद्रलेला.

परवा त्याला अचानक पाहिला
चौपाटीच्या काठाशी
पाठशिवणी खेळताना पोराटोरांशी
मी खात होतो मुलाबरोबर भेळपुरी
आणि मुलगा जात होता त्याच्याकडे
वाटले, आता निवृत्त झाल्यावर
त्याच्याच काठाशी बांधावा बंगला
सतत छाटाव्या गप्पा
आठवावे जुने पुराणे बासनातले खेळ
उकरून काढावे वाळूमधून
कोरलेले रेघोटी वेल
फॉसिल्समधला पुन्हा वाचावा
बाळपणीचा इतिहास
अज्ञात होऊ पाहणारा.

....दचकून जागा झालो दिवास्वप्नामधून
मुलगा खेळत होता वाळूत
आणि तो होता रंगला मुलाबरोबर
मुलाएवढा होऊन
मी फक्त मख्खासारखा उभा
आणि माझ्या मागे—
माझ्या मागे पेटले होते रान
मेलेल्या श्वापदावरती तुटून पडणाऱ्या
वखवखलेल्या अधाशी
गिधाडांसारखी ताडमाड पत्री

झपापत होती, पंख पसरत होती
फडफडत होती, उसासत होती
झपाटल्यासारखी तुटून पडत होती.

मधूनच उमटणारी त्याची ललकारी गाज
तिला दूर लोटणारी, लोटू पाहणारी
गिधाड-पंखांची झोंबाझोंबी झपाप
पिवळ्या नारळ-झावळ्यांमधून
धगधगले होते सांज-कवरे अस्मानी स्मशान
थेंबभर गंगोदकाचा घोट घेण्यासाठी
चितेप्रमाणे स्वैरभैर उफाळत होत्या ज्वाळा
सभोवार सुतकी उदास अवकळा.

माणसे वाढतात. वाढत राहतात.
तरारलेले त्यांचे अवयव कालपरत्वे
शिथिलतात. गात्रे कोमेजतात. ओसरते
रग अंगातली. हटते अजाण कोवळीक
चेहऱ्यावरून. पडते अलगद गळून
गळलेल्या वर्षाबरोबर डागळून
कालातीत पानगळ अखंडपणे चालत आलेली
....चालणारी
वाढत नाही मात्र समुद्र.

## स्कायस्क्रेपर

ढगाळ
आकाश
गढूळ
प्रकाश

लखलखन उजळते श्रावण-ऊन
धडकते सूर्यबिंब डोळे दिपवून
समोरच्या राजस स्क्रेपरवर लकाकते
प्रकाश-पिंजण, तळपते रंग-शिंपण

हजार हजार खिडक्या चमकतात
कंगोरी-कडा चिरेबंदी कातीव रेषा
सुसाटत सुटतात अधिकच उंच
झेपावतात जोषात. हलकेच सरकतो

संथपणे मेघ स्क्रेपरआडून एक
पक्ष्यांचा थवा थकलेला बुजरा, घारीचे
विघ्न-वर्तुळ. भरकटलेले एक-दोन पतंग.
कौलारू घराचा तांबूस फुलोरा, एक

झपाटलेला ताड तीन मजली बसका.
कंगोरी उभट उड्डाणणारी स्क्रेपरची रेषा
गर्व-बिलोरी खिडक्यांची उद्दाम भाषा.
लगटतो पुन्हा तावदानाशी मेघ. ठळकतो

सेल्फ-कंटेंड फ्लॅट. फ्रीज सोफा ग्राम
गीझर बझर मिक्सर. तपमापकी लिफ्ट.
सहारा ते सिमला नवी अनोखी मळवाट.
कलंडते बिंब. काळवंडते आकाश विषण्ण.

उदास दीप्ती. मलूल प्रकाश. हळूहळू पेटले
खिडक्यांची बल्ब-माळ. अल्लाउद्दिनी चिराग.
थरथरत्या संधिप्रकाशात स्क्रेपर होतो
अधिकच सुन्न. विलक्षण भकास. खिन्न.

उड्डाणणाऱ्या सिमेन्टी रेषा उडताना अडमडतात.
हिरमुसतो डुरूप. सावलीचा चौकोनी पहाड
कसाबसा सताड असतो उभा. शापदग्ध इंद्र
क्षतबंबाळ, अंगभर रक्त, भळभळत्या भेगा.

## कॅक्टस

झुम्मड कॅक्टसचे हिरवेगच्च खुजे डुरूपलेले मीपण
अंगभर ओरखडी काटे कुब्जेहून अब्जतर कुरूपपण
शांतगार सावल्यांच्या तळी विसावला विखारवर्खी साप
सळाळून उठते आग सैरभैर फेकून विजारीगत कात
मधूनच वैराणवाऱ्याला सुचते छेड.... एक ओलसर शिडकावा
नि गात्रागात्रामधून झंकारतात लाल तांबुस मृगगोपी तारा
हळदपिंजर कुयऱ्या घेऊन जाणाऱ्या वाटेवरल्या सघन गौळणी
निथळते चुनडी रंग त्यांचे लफ्फेदार काबुली पदर पायघोळी
चिचकतात घाणेरी गेंदेदार घेतात मिटून घागरे बळेबळे
खळखळून हासतो मी कॅक्टस माझे क्लोरोफिली व्हकणे

## साई सुट्टचो

कुरळभुरळ तैलसर केसांच्या दाटदाट घनदाट बटा
मधूनच मंदत धुंदत वटवटणारी एकलकोंडी कलाबतुच्छटा
हा इथे स्वर्गंगी धागा लपत छपत चमकत ठुमकत काळ्या
आड अडलेला तो तिथे चिडलेला चिडीचूप बसलेला तिसरा
ही इथे चवथी चवखई थर्थरत सरपटत लगबगत अलगदत
वर डोके काढत गुडुपणारी पाचखई....सहाखई....सातखई....
अनेक अनेक काळ्या आड दडणाऱ्या गुंगणाऱ्या शुभ्रभोर वेल—
वेढाळू वळणे आडवळणे टाकत टाकत शेपट्यांमधून खळाळत
सळसळत वळवळत वेणी तिपेडी कुरळी मृदुला गुणगुणत
धरणीवर झेपावत म्हणतात साई रुट्टयो....बोटे मात्र बिलंदर
अजूनही आसुरी धुंदीत धरतात ताल करतात धमाल
गनिमी चाल
धा धिक् धा धिक् धा धा धा

## उकाराच्या सफाईने

उकाराच्या सफाईने जीव घेऊन पळणारे कुत्रे तसे आम्ही
मध्यमवर्गी मित्रे. सतरा जीवघेण्या काळज्या आमची
उडवतात त्रेधा.
विनधोक मिळावा विमा म्हणून आम्ही दिवसादिवसाला जपतो जीव
थोडेसेही हीव अंगअंगभर शहारताना ओलांडतो घाईगर्दीने
डॉक्टरी शीव.
आमचा बँक-अकाउंट फुफ्फुसासारखा. भरता भरताना रितावणारा
आमच्या आशा-अभिलाषा कोत्या.... तुटपुंज्या.... उंबरठ्याच्या
क्षितिजापुरत्या.
आमचे खाणेपिणे माप-मोजलेले. रक्तदाब वाढवतो आमचा आब
डायट म्हणजे हळूहळू गव्हले गिळणे– दॅट ईज मोठ्या घरचे
चमचमीत चोचले.
पोषाकाला सजवते आमची काया. पोक जातो बाहेर वाया
त्यालाही आत आत खेचत असतो निर्भीडपणे आमचा दर्दभरा
दम–डांगी खोकला.
उसळ-मिसळ खात खात संपवतो आम्ही आमचे सुखवस्तू जीवन
रात्रीसारखे झटकन्, कुबेरसुद्धा कार्डलक्पुढे आमच्या सदोदित
होतो हतबल.
आणि आमच्या उरलेल्या कर्जावर खर्ज लावणारी आमची
गोतावळ देते शिव्या, इतक्या गुदगुल्या म्हणतात पेराव्याच
कशाला ?

## किडनी-पर्व

सर्जनची लामणदीप्ती बोटे कधीही नसतात
थर्थरत; थरकंपत. ती राहतात स्थिर गतिमान
एका उद्दंड विश्वासाने ओतप्रोत भरलेली

भारावणारी. त्यांना समजत असते खरेखुरे
भविष्य. अटळ मृत्यूला दूर लोटण्यासाठी
आसुसलेली. आतुर. उतावळी. असेच एक बोट

म्हणाले तुला— थांब! इथून पुढे आपल्याच
पावलांनी वाटचाल करण्याआधी
या बोटांना चाचपडू दे तुझे नशीब
मायक्रो-लिपीत ललाटावर लिहिलेले....
....ऑपरेशन

एक गडगडाटी शब्द. डोंगराएवढे काहूर
उठवणारा. भयभोर अक्षरसमुद्र. विजेचा
झगझगाट नि चापल्य एकवटून कडाडणारा

अनेककंपी शब्द. जसे की दोन समांतर
आरशांत तेवत ठेवावी पंचमुखी समई
आणि प्रतिबिंबांच्या कोलाहली लखलखाटाने

जावे दिपून चकित, भयकंपित.... तसे घुमले
अनेक प्रतिध्वनी, प्रतिशब्द.... नर्स, क्लिनिक
क्ष-किरणी डांबरी फोटो, बँडेज, कॅथेटर....

त्रयस्थी अलिप्ततेत ऐकलेले शब्द स्वसंदर्भात
होतात क्रूर. उठवतात काक-काहूर. ऑपरेशन
एक समस्यापूर्ण अक्षरसंच. अनेकपडसादी

करुण व्याकूळ कर्कश भैरवी. आशेच्या खांद्यावर
सतत सुखात्मिकेचे उपसंहारी स्वप्न रंगवणारी
भाषा. स्मशानशांततेहून अलीशान असते

ऑपरेशन थिएटर जंतुनाशकांच्या वासाने
वर्दळलेले. जसे की नाक सर्द सर्दीने थबकलेले;
आणि दार असते शिकाऊ. स्ट्रेचरला आत

घेऊन अलगद कठोरपणे कोयंडा लावणारे
कर्तव्यदक्ष.... नंतरचे दोन तास भयाण
विमनस्कता घेऊन घरघरत असतात. दर्यावर्दी

सिंदबादसारखा अपंगलो मी धडधाकट;
धडपडत होतो सतत त्यांचा जख्खड ऑक्टोपसी
विळखा विस्कटण्यासाठी. गुंगीच्या धुक्यात

तुला नव्हती शुद्ध, जाणीव असणे आणि
न-असणे यांच्या ऐलपैल पसरलेल्या प्रकांड
शांततेत तू पहुडली होतीस. वजनशून्य

अवस्थेतील विमुक्त संचार. तुला दिसलेच
नाही काही. माझा खप्रारती चेहरा, मुलांची
चाहूल. गणगोती कडे. साखळदंडाहून वळदंड....

सर्जनचे सवयसुलभ हात, लामणदीप्ती बोटे
सलाइनचे टयूबोळे. सांडलेले रक्त, रक्तरंजित
बँडेजी बोळे, ब्लडमॅचिंगची चिकित्सा, हेमोग्लोबिन,

नर्सची हुरहूर, उतू जाणारी ब्लडप्रेशरची
चकाकती रेष, धपापती छाती. गुंगीचा पहाड
आड करून तू होतीस स्वस्थ मलूल

अंगभर गोणपाटाएव्हढा थकवा घेऊन
हत्तींच्या पायांनी झंझावातून आलेले काहूर
मुंगीच्या पावलांनी अलगद घालवण्यासाठी.

मध्यंतरात एक धन्वंतरी मन्वंतर सरले
व्रणाएवढ्या टीचभर उरल्या आहेत आठवणी
त्याही अस्पष्ट होतील; जेव्हा जेव्हा मुले तुला

घट्ट घट्ट कवटाळून म्हणतील आई, आई,
तेव्हाच फक्त क्षणभर जागे होईल मनात
चंद्रभेगाळी जखमेचे बुजून जाणारे
किडनी-पर्व.

## ब्रा-बंद्वण

न्हालेल्या उघड्याभोर पाठीची गौरकाय भिंत
संगमरवरी चकाकण. अर्धामुर्धा हिरमुसलेला
शेपट्याचा पीळ. अधांतरी चमकणारा एक एकलकोंडा
अळंबी तीळ. चारदोन रेंगाळणाऱ्या थेंबांची चमचम.
मधूनच लवलवणारे माझ्या वासनेचे पिंपळपान.
अंगभर सळसळणारा विद्युत्‌वेग. कोंडलेला, अडलेला
आवेग. उसळणारे अश्वबळ. धांदरटी धपाप. तू
अचल. मी प्रबळ. झंझावातात पहात चाचपडत्या
बोटांची तुझी ब्रा-बंद्वण.... किंचित सलगीदार
मान. घसरणारा पदर. केसांचा वर उचलून झटक—
ताना

उतावीळपणात इतस्ततः तुषारलेला श्रावण-शिर्वा
खोलीभर प्रकाश अंग-पिवळा.... नि मग दारावर
गलबलत येणारा बोबडा गोंगाट....

## आम्ही आपल्या ऐकाव्या

आम्ही आपल्या ऐकाव्या
दोन टाळ्या
सुतक-सुवेराच्या
एकीसाठी कान
सुईएवढे
दुसरीसाठी सुपाएव्हढे

दोन टाळ्या
अचानक पडणाऱ्या
आम्ही आपल्या ऐकाव्या
कधी तरी, केव्हा तरी
प्रयोगशाळेत हवाबंद
गगनी समीकरणे
मांडता मांडता
उत्पत्ती, स्थिती, लय
सत्यम्, शिवम्, सुंदरम्
बरळता बरळता
ऐकाव्या कधी तरी

आणि ढासळणाऱ्या आमच्या
बिनचूक द्रष्टेपणाला सावरण्यासाठी
स्क्रेपरएव्हढे बळे बळे हसून
म्हणावे—
आर एन् ए, डी एन् ए—
पर्यंत तर आज आलो
आता सुतकसुवेर म्हणजे काय,
दोन मिनिटांची
वादळ नि शांतता—जेमतेम
शतका-अर्धाशतकाचा तर पल्ला.

## दूरवर दुपारभर

दूरवर दुपारभर पसरलेला फेक पिवळा ज्येष्ठ
मनावर अनावर दडपण. बसकण मारलेले आसमंत
हिरव्यागार झाडांच्या शेंड्यांमधून बावळ्यासारखा

घुसमटून डोके वरवर काढणारा गुलमोहरी अचंबा
इतरत्र शुकशुकाट सर्वत्र उजाड सुना सुना रस्ता
नि बेबंद धावणारे दुतर्फी धपापते थडग्यागत दगड.

घाम गळत राहतो उत्साहाचे पाणी पाणी करून.
काळ टळत असतो घटका पळे आस्ते आस्ते खुडून.
निव्वळ भास इकडे तिकडे श्वास टाकत
वणवणत राहतात

जिथे कुहूकुहूते झाड तिथे साद पडसाद हुज्जत घालतात.
अशा रणरणत्या वातड वेळेला असते भाकड चौकट
त्रिघडल्या घड्याळागत मन बसते स्वतःलाच हुडकत.

## कसाटा

हिवाळ्यातल्या गुलाबी थंडीचा थडथड कडाका
असा कसाटा विर्घळत राहतो ओठावर.... नारिंगी
संत्र्यांच्या चुर्रकडवट सालींचा चवदार दरारा
मधूनच फणकारतो. दुखऱ्या खुपऱ्या दाढेची एक
कळ वळवळत वर येते. व्हॅनिलाच्या मंद कुसुंबी
निथळत्या लफ्फेदार लगडीमधून धडपडत बाहेर
पडते नक्षीदार दगडी सलगी.... गोवला जातोय मी
पाघळत, घरंगळत, चिरडत चोचलेदार बदाम मनुका;
कडवट चॉकलेटी मलई सुस्तावते, गुरफटून टाकते
मद्यार्क-धुंदी. सभोवती उलगडत राहतात नारिंगी
स्वर. विना अस्तर कॅबरे डान्सर लकाकते, लचकते
घेत घेत गिरकी. दचकतात डोळे. ओठावर ठसलेला
उरलासुरला कसाटा विर्घळताना मी विसरतोय
आठवतोय...बहरलेले आपले ऐन धुंदीमधले
हिवाळ्यातल्या गुलाबी थंडीचे विनातृप्त कसाटे.

## जसे मेरी-गो-राउंडचे घोडे

जसे मेरी-गो-राउंडचे घोडे
गरगरत उधळतात आणि कळ
संपल्यावर स्तब्धावतात.... तुझ्या

आसपास घुटमळणारे माझे हे विचार
तसे कधी हिंदोळतात गॅलपिंगच्या
नशेत. तेलनिसरड्यावरून केसापाठच्या

चालत राहतात. तोल सावरत आवरत
केसांच्या ओघळत्या आलापीतून
तल्म फुलारत गुणगुणत राहतात.

कधी कधी ते चौखूर उधळतात. वर्तुळी
रिंगणात मग्रुर गुर्मीत बेबंद घोड्यासारखे
टापांच्या ठेक्यात अंगभर फुलवून

उर्मिल उन्माद उघड्या नितळ खांद्यावरून
सरळ फेकतात झोक
ध्वजाळ छातीवरती
नौबती नशेत डंका पिटत पिटत मनाशीच.

कळ संपल्यावर रेंगाळत स्तब्धावणाऱ्या
मेरी-गो-राउंडच्या घोड्यासारखे तुझ्या—
आसपास घुटमळणारे माझे हे विचार

दिनदर्शिकेच्या निर्धोक फलांगांवरती
नजर रोखतात नि कधीमधी खुशाल
ग्लानीच्या टवटवीत उभे राहतात सोडून

अधांतरी पाय.

## आपल्याला जमत नसते हे

समुद्र बुडताना सोन-शेंदरी सूर्यास्तात
आपण उभे असतो
काठावर ओलसर वाळवंटात
परतण्याच्या घाईगर्दीने
भरलेले, लगबगलेले.
मुले खेळत असतात
शंख आणि शिंपा आणि कवड्याबिवड्या
निवडत, चिवडत.

समुद्र सूर्यास्तात बुडाल्यावर
सुसाटत येते कातरवेळ किर्र किरमिजी
मृत्यूची भयाण सावलीच जशी
मुलांना समजत नसते ते
आणि आपल्याला जमणारे नसते हे
शंख आणि शिंपा आणि कवड्याबिवड्या
निवडणे, चिवडणे
कातरकाळ्या गुलबकावलीच्या बागेत.

## फ्लायओव्हर

एखादी अलीशान घमेंडखोर कार
धस्सकन पिंकून जाते श्रावण-सकाळी
डांबर-रस्त्यावर पेट्रोलचे मोरपीस;

धजत नाही मन पिसावर पाय द्यायला
उचललेले पाऊल हटकून स्तब्धच बसते
जसे की पुतळी घोड्याने त्वेषाने घेतलेले

अधांतरी बद्ध-उड्डाण. अलगद उभारला जातो
मनातल्या मनावर सिमेंटी जड अवजड
फ्लायओव्हर पूल. मनातली अस्वस्थ चाहूल

फरफटत नेण्यासाठी ....साकळल्या क्षणापासून
विचारांचा गलका दूरदूर काढण्यासाठी
चेवाचेवाने ओठ चावून वर येणाऱ्या

समष्टीच्या सुस्काऱ्यापासून दूर ....दूर ....
पेट्रोलचे मोरपीस चमकत ठेवण्यासाठी
असे अनेक सतत फ्लायओव्हर पूल बांधत

स्वतःला सांधत गर्दी हटवत विचारांची
वर्दळ रेटत दरवळणाऱ्या सुगंधाला
वाट देत मन बसते फ्लायओव्हरवर गाणे गात—

नाच मोरा नाच मोरा नाच नाच नाच
निळ्या निळ्या आभाळाची फुटलेय काच

## उद्याच्या सॉफिस्टिकेटेड

कबरभर असतात रस्ते खोदलेले
लाल दिव्यांचे गुलाली दैवत
हटवते गर्दी इशारून दूर.... धोक्यापासून

तरीही भरगच्च रहदारी वाहते
ढिगाऱ्यावरून, खोदलेल्या खड्ड्यांच्या
काठावरून साखळदंडाएवढी दोरी

धरून धरून निर्भयपणे.... कुणाकुणाच्याही
चेहऱ्यावर खंत-खेद लवमात्र असंतोष
नसतो. सरावल्यासारखे सारेच चालत

राहतात. लोळत पडलेल्या अवाढव्य
ह्यूम पाइपवरती मुले बागडतात, हगतात,
लपालपी खेळतात, कुत्री करंगळी

करतात. पटकुरे, चिरगुटे वाळत राहतात
ह्यूम पाइपांना क्षणार्धात डोंगराचे
दीर्घायुष्य मिळते. पायाखालचा एक रस्ता
नासलेल्या धमनीगत निकामी झाला आहे

इतक्याच माफक विचाराने व्यवहार
चालू राहतात.... रस्ता काय नि धमनी काय
कामकाज करणारा, करवणारा— कुणालाही

इथे नसते किंमत. एका प्रचंड बेफिकिरीत
उचलत असते हे जग झपाझपा सावधपणे
पावले. उद्याच्या सुखलोलुप सॉफिस्टिकेटेड

संस्कृतीकडे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२२३९५
का. म. काव्य
२३७३
ग्रंथ शाखा (स्थानक मार्ग)

## स्कायलाइन

संध्याकाळ कलंडताना झगमगून उठते
मुंबईची किनार-स्कायलाइन.
काळ्या घनछायांची रेखीव आखीव शिल्पे

अंधार उतरताना स्पष्टपणे ठळकतात.
अंजिरी किरमिजी रंगांच्या सैरावैरा अस्त-रेषा
विरताना गातात आग-भैरवी.

एक फायरब्रिगेडी यंत्र उगाचच डोक्यात माजवून
काहूर सळसळत दौडत जातो.

भांबावते मन.... सांभाळू लागते वासनांतली
जुनाट विचारांची लक्तरे.... तोच
दूरच्या कळसाला फुटलेला असतो सांज-आरती-कंठ

पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिति.... तदप्येष–
श्लोको ऽऽ भिगीतो ऽऽ मरुतः परिवे ऽऽ ष्टारो ऽऽ
मरुतस्या ऽऽ इ ऽऽ ई ऽऽ उ ऽऽ ऊ ओ औ अं अः

## चपापतो माझ्याआडला मी

समारच्या कट्ट्यावर कावळ्यांनी लदलेल्या
ओळीमधून धुमसणारे मनातले विचार
चित्रातला जसा गरम धुंद थिल्लर संग-शृंगार

प्रत्येक कावळ्याची सैल-मैल फिरणारी बुबुळे
टिपून घेतात वाटेवरच्या बेल-बॉटम-बेलीयांचे
श्वास, थिल्लर चाल, टॉपलेसी नखरा नि
अवयव यव यव यव

चपापतो माझ्याआडला मी पसरत जाणाऱ्या
मनातल्या अंधारात उजळताना कभिन्न हलते
रांग; लखकन फुलतो उन्हाचा निष्पाप फुलोरा

उजळतो मनामधला कोपरा नि कोपरा सांदीफट
गोरामोरा मी बसलेला असतो कावळ्यांच्या रांगेत
पहात समोरच्या कट्ट्यावरची माझीच काव काव काव

# मनातल्या बुलडोझरने त्याने

" काल मी आले....उद्या लगेच
चालले.... घरी हे एकटेच
पडतात.... दुखलं खुपलं.... "
कसेबसे संपवून शब्द
तिने फिरवले तोंड नि गिरवले
लाडे लाडे रस्त्याचे वळण
नेहमीसारखेच....
मनातल्या बुलडोझरने
झपाटून त्याने उपसले झपाझपा
समोरचे टेकाड, खोदली
पाच सहा विवरे, ठिकऱ्या ठिकऱ्या
केली दगडांची धारी, तरीही
न राहवून उपटल्या बचाकभर
झिंज्या.... झटकले बोटांच्या पेरावर
घरंगळत आलेले भाळावरचे
अभद्रतेचे दव.... उफाळून उफाळून
येणारा उरातला ज्वालामुखी
शमवण्यासाठी लाव्हाला वाव देत....

## अशीही माणसे आढळतात

अशीही माणसे जवळपास हरघडी आढळतात
क्षितिज ज्यांच्याकडे लीन होऊन धावत येतात

प्रत्येक पडणाऱ्या पावलापुढे ज्यांच्या उलगडतात
शेवरीच्या गाद्या गिरद्या आणि मुठीमधून सांडतात

लाख सव्वालाख शंभर नंबरी मोहरा. पाणहुडक्याने
धरणीखालची सहजगत्या अजमावावी कान लावून

झऱ्याची धमनी, तशा कमानी माना-पानाच्या हलकेच
डोक्यावरून त्यांच्या बेडूक-उड्या मारत जातात....

कर्णाच्या त्रस्ततेत रुतलेले रथचक्र रिपेअर करताना
अथवा चितेच्या खाईवर स्वप्नांची साय पांघरताना

अशीही माणसे भेटतात जी इंपालामधून राजरोस
कान कोरत, पान चघळत शतपावली घालत राहतात.

## काठोकाठ ब्राँकायटलेला

किनाऱ्यावर खोळंबलेला समुद्रसूर्यास्त
नि काठावर अधीर म्हातारा कोळी. सरसर
फेकतोय अवजड अवजड मच्छरदाणी जाळे
महाप्रयासाने दूर....उंच....वरवर....ढगभर....
बसत बसत येते धप्पकन रगडराठ जाळे
घसरतो सूर्य.... पसरतो समुद्रभर उरतो
काळ्या दगडखडकाळात एकलकोंडा
झपाझपा शिसवी पुतळ्यासारखा हेकट
नेट लावून आटोकाट गुरफटून सूर्य ओढणारा
तप्ताळ जर्जर म्हातारा कोळी आणि मी
किनाऱ्यावर खोळंबलेल्या समुद्रसूर्यास्तात
जर्द समुद्रसर्दीने काठोकाठ ब्राँकायटलेला

## सिंपल हार्मोनिक मोशन

समुद्रलेले तुफान अंगभर लपेटून, पेटून
सिंपल हार्मोनिक मोशनच्या तालात झुलत, लवत
लाटांच्या खालीवर नेटामधून कोसळत, उसळत

सरसावून पुन्हा कारंजी जोषात उठत, आंदोलत
भोवऱ्यागत भोवळत, अडखळत. खोल खोलवर
जात जात उधाणत, उसळत, फिसफिसत हसत

दूरदूर ढकलत पांघरुणी किनारे.... निवारे.... वारे
सिंपल हार्मोनिक मोशनच्या सुरात चालणारा हा
चमचाभर सुखाचा खेळ.... मिनिटांचा मेळ

आता निवळली आहे भरती.... वळली आहे क्षितिजाकडे
अर्धतृप्त, अर्धतप्त शंख नि शिंपा पडल्या आहेत
अस्ताव्यस्त उघडयावर रवेदार वाळूत मुसमुसत

धुसफुसत स्वतःशीच. नव्या भरतीचा कल्लोळ
आळवत, चाळवत. मनातली सिंपल हार्मोनिक—
मोशन गुणगुणते आहे लयीत मंदमंद आंदोलत

धुंद धुंद होत होत थुन थुन थुन थुन मैथुन थुनथुन
थुनथुन मैथुन थुनथुन थुनथुन मै.... मै.... मै....

## स्कायलॅब

रंध्राएवढी गृहाछिद्रे तडकतात अचानक
सुसाट सांडणारी अब्रू थोपवताना थबकतात हात
दारे खिडक्या शटर्स बंदवणेही सोडतात अर्धवट

ओठ चिप्प असतात चिपांगत सोन्याच्या. टवकारल्या
कानांना जाणवते सभोवतालची हिणकस कुजबूज
थबकून बसतात पाय, कासवाने आत आत ओढलेला

हुरूप. चौफेर नजर फिरवायला ओशाळतात डोळे
चारचौघांत हिंडायला धजत नाही मन. झोप
गोठून गेलेली असते उत्तर ध्रुवावरील अवर्षणी

वर्षासारखी. जीभ तडफडत राहते स्वतःशीच एकटी,
बडबडती ज्योत जशी. आपणच आपल्याआड
स्वतःला कोंबून कोंडून लपवताना नाकारते मन

स्वतःचे अस्तित्व. शतखंडित अवस्थेत त्रिशंकूसारखे
भ्रमणताना उभे आसमंत वाटते खेळते आहे खेळ
कानगोष्टींचा. कानाकानांच्या आळ्या-पाळ्यांतून

वेडेवाकडे सुसाट विस्कट वारे शब्दाशब्दांचे गुणाकार
राहतात करीत....अशा जगबुडवेळी तावून सुलाखून
निघतात गणगोती नाती. मन भाबडे उगाचच

बांधून राहते स्वतःभोवती सतत गरगरत राहणारी
स्कायलॅब. गळ्याआड अडलेली हुंदक्यांची बीप् बीप्
बदलवण्यासाठी.

## पाखरांनो, मारणार का सी. एल. ?

घराकडे परतणाऱ्या पाखरांनो
आता पसरते आहे किर्र कातरवेळ
थकलेले तुमचे पंख फडफडवून

शिस्तशीर या. हायव्होल्टेज वाहक
वीज-तारांचे करा रूळ—अंतर राखून.
हाच एक धोपट मार्ग आहे परतण्याचा.

मातीवरील रस्त्यांना फुटत जातील
फांद्या. कुठे एखादा गल्लीबोळ आडदांड
त्रिकट वहिवाटीसारखा चोरपावलांनी

गुडुप होईल अंधारात; चाललाही असेल
मोकळ्यावर तिथे भांग-भट्टीचा व्यवहार.
रंगला असेल तीन-पत्ता. खिडक्यांना

खिळल्या असतील खिळखिळ्या बायका.
काम-कफाने बदबदलेल्या. वारा असेल
पहारा करीत हँगओव्हरच्या कैफात....

होकायंत्राच्या दिशा-लक्ष जागरूकतेने
घराकडे या. जसे की एखादे जेट लोंढा
सोडत गोरज मुहूर्तावर थेट धावपट्टीत

स्केटिंग करीत शिरते. तसे या. नका
चुकू-चुकवू वाटा. वीज-तारांना सतत
समांतर राखा. अंतर राखून या. इथे

निऑन-ॲड-साइन्सचा उडेल आता गलका.
उठेल जल्लोष. पसरेल कलाबुती लखलखाट.
पेटतील रस्त्यावरील सूर्यफुली दिवे.

उजळतील यक्षिणी-कांड्या, दुकाना दुकानावर
चंदेरी दांड्या. हळूहळू जागे होत जाईल
शहर. पाखरांनो, तुमच्या डोळ्यांवर

पेंगते आहे मध्यान्ह रात्र, कातळ काळा
प्रहर. थकला असाल. पंख फडफडवून
खुपसा स्वप्नांत चोचा. वाचा राशि-भविष्य.

चघळा चविष्ट रतिरंगेल चोथा; पिलावळी
गोतावळ्यात करा स्वस्थ-स्वंथ. झांझर
उद्याळताना सकाळी घेणार का — सूर्यझेप ?

का मारणार सी. एल. ? पाखरांनो, तुम्ही तर
चिवचिवत बसला. बाचाबाची, तंटेबखेडे
उकरून काढीत. आपल्या सॉफिस्टिकेटेड

संस्कृतीसारखे. अशिक्षित, निष्पाप पाखरांनो....

# ट्रॅफिक आयलंड

गरगरतेय समोरचे
ट्रॅफिक आयलंड. फिरतेय
स्वतःभोवती ....माझ्याही

मनाभोवती अथवा असेही
म्हणता येईल ....मन पिसाट
माझे घालतेय पिंगा

ट्रॅफिक आयलंडभोवती ....खट्ट.
चमकतो नादहीन प्रकाश
दिवा भगवा-हिरवा

पालवतो पालवीसारखा
वाहने उचलतात पाय.
घेतात व्रे ऽ ऽ ऽ ग कार

अँब्युलन्स, बस काळ्या-पिवळ्या
कॅब्र स्कूटर्स ट्रक्स लॉऱ्या
जातात झपाझपा ....खट्ट.

खुला होतो पदयात्री रस्ता
मी चालतो भरभरा. कापतो
आखीव शुभ्ररेषा थबकतो

इथे तिथे अलिकडे पलीकडे
कोण हे जातेय ? तंग चोळी
मानेवर केसाळ रेशीम-पाळ

फुलारतो पिसारा हेअर-डू .... खट्ट.
दचकतो नादहीन प्रकाश
दिवा पिवळा लाल
थबकते पाऊल

हेलावते कुतूहल-हेअर-डू
पफ् पावडर ट्रक कार
ऊन्ह-नितळ ब्लाउझपाठ

किमोनो थाट किंचित उकलती
बकल ब्रा-गाठ .... खट्ट.

चाचपडत कानोसा पकडत
जातोय एक आंधळा थेट
बिन अडखळत लाल-पांढऱ्या

काठीवर रोवून भार .... कार
ट्रक बस स्कूटर घेतात ब्रे ऽ ऽ ऽ ग
गरगरते ट्रॅफिक आयलंड

स्वतः भोवती अथवा असेही
म्हणता येईल मनपिसाट
माझे गरगरतेय ट्रॅफिक आयलंड

भोवती .... दिवा भगवा-लाल
.... खट्ट.

## ट्रॅफिक आयलंड

गरगरतेय समोरचे
ट्रॅफिक आयलंड. फिरतेय
स्वतःभोवती ....माझ्याही

मनाभोवती अथवा असेही
म्हणता येईल ....मन पिसाट
माझे घालतेय पिंगा

ट्रॅफिक आयलंडभोवती ....खट्ट.
चमकतो नादहीन प्रकाश
दिवा भगवा-हिरवा

पालवतो पालवीसारखा
वाहने उचलतात पाय.
घेतात व्रे ऽ ऽ ऽ ग कार

अँब्युलन्स, बस काळ्या-पिवळ्या
कॅब स्कूटर्स ट्रक्स लॉऱ्या
जातात झपाझपा ....खट्ट.

खुला होतो पदयात्री रस्ता
मी चालतो भरभरा. कापतो
आखीव शुभ्ररेषा थबकतो

इथे तिथे अलिकडे पलीकडे
कोण हे जातेय ? तंग चोळी
मानेवर केसाळ रेशीम-पाळ

फुलारतो पिसारा हेअर-ड्र ....खट्ट.
दचकतो नादहीन प्रकाश
दिवा पिवळा लाल
थबकते पाऊल

हेलावते कुतूहल-हेअर-ड्र
पफ् पावडर ट्रक कार
ऊन्ह-नितळ ब्लाउझपाठ

किमोनो थाट किंचित उकलती
बकल ब्रा-गाठ .... खट्ट.

चाचपडत कानोसा पकडत
जातोय एक आंधळा थेट
विन अडखळत लाल-पांढऱ्या

काठीवर रोवून भार .... कार
ट्रक बस स्कूटर घेतात ब्रे ऽ ऽ ऽ ग
गरगरते ट्रॅफिक आयलंड

स्वतः भोवती अथवा असेही
म्हणता येईल मनपिसाट
माझे गरगरतेय ट्रॅफिक आयलंड

भोवती .... दिवा भगवा-लाल
....खट्ट.

## पावसाळे आले... गेले

पावसाळे आले.... गेले....
दोन मुले ओळंबली
फ्रीज-मिक्स घेता घेता
कळी नवी खोळंबली

पावसाळे येता येता
मांसावर मांस आले
डिस्पेप्शिया, पायोरिया
श्वासांनाही वास आले

पावसाळे जाता जाता
स्थैर्य आले, धैर्य आले
पथ्यपाणी चिंता व्याधी
जागोजाग खडे झाले

—काळे काळे मेघ आले
निळ्या निळ्या सरी आल्या
ओल्या ओल्या आठवणी
टीव्हीतून घरी आल्या.

## कॉंक्रीट-स्लॅबच्या डोंगर-डोलाऱ्याला

कॉंक्रीट-स्लॅबच्या डोंगर-डोलाऱ्याला
सहकारी करंगळ्या लावतात हातभार
वासे-फळकुट्यांचा....ज्यांच्या शुष्क

थकत जाणाऱ्या लाकडी नसानसांतून
वाहतात पाट आशा-आकांक्षांचे नि
क्षणाक्षणाला खग्रासत येणारे नैराश्य

उरल्यासुरल्या आयुष्यात राहते संथपणे
विर्घळत.... चिडत.... आर्जवत....तेव्हा
तसूतसूने
उंच होत असते गोवर्धनगिरीधारी

कॉन्ट्रॅक्टरची अमोघ, सराईत करंगळी,
कर्मण्येवाधिकारस्ते डोस रक्तात भिनवत.

## जगणे त्यांचे

जगणे तिचेही—
तडकल्या काचेत
अडकला सूर्य
झाकून ठेवणे

त्याचेही जगणे
लंबक काढल्या
घड्याळासारखे
सुसाट धावणे

## अटळ ॲलर्जी

....शो सुटताना
श्रावणशिव्यांसारखा गर्दीचा
लोंढा विस्कटून गेला फुलवलेला
अंधार एकान्त. छत्रीने सूर्याला
झाकण्याचा मी यत्न केला. इतर
संभावितांसारखाच.... ठिक्करलेल्या
ठिणग्या मला सतत दाखवत होत्या
' नातिचरामि 'चे ठिगळलेले आकाश.
नजर माझी खरेच भिरभिरत होती
अवतीभवती. अनोळखी चेहऱ्यांवरून
वळत.... चळत.... श्रावणशिव्यांसारखा
गर्दीचा लोंढा नंतर विर्घळत गेला
नेहमीच्या बंदिस्त एकान्तात— हे असे
अधून मधून अवचित घडते. अटळ
ॲलर्जी अंगावर उठते....जाते....

# लखलखून अंधारणारी

लखलखून अंधारणारी
एखादी किर्र ऽ ऽ सुंदर उल्का
तुझ्या मनात उडवून देते
गोंधळगलका
बादरायणी संबंधाचा

तू विलगतेस अलगदपणे
तुझ्या हालचालींचा
तालबद्ध चुकतो ठेका
भिरभिरत जमा होतात
डोक्याभोवती शंकाकुशंका

....बळावते व्यथावळ आणि
ओसरतात दुथडी वाहणाऱ्या
तांबूस हस्तरेषा.... जेव्हा
कानावर पडतात वार्ता
योगायोगी अपघातांच्या

तुझ्या मनात उठते भीतीचे
बळकट वारूळ; रिते होतात
हुरुपाचे कानेकोपरे. पाय उचलत
समोरच्या रस्त्यावरून सरावाने
मी मात्र जात असतो ऑफिसला

तंद्रीत.... संथपणे आज उद्याची
टाकत पावले. चौकाचौकातून
चालताना मला काठोकाठ
आठवत राहतो तुझा भेदरट
कबुतरी फडफडाट.... जेव्हा

समोरचा पुतळा ओलांडताना
माझेही हुकते पाऊल. माझ्याही
मनात जागा होतो बादरायणी
संबंधाचा हेलकावी आलेख
भोवतीचे विस्तीर्ण निळे आकाश

आकसून इवलेसे होते.... फाटते
पुतळ्याजवळच्या कबुतरी
फडफडाटाने.... तू तुझे
भांडीकुंडी आवरणे जरा जपून
करीत जा. एकटी असतेस....

## धगधगीत अंजारूगोंजारू

धगधगीत अंजारूगोंजारू विस्तवी सर्वस्व
देता घेतानाही आपण राहतोच अबाधित ठाम
आपापल्या कक्षेत स्तब्ध, नितळ बंदिस्त. एकरूप

होता होतानाही राहतेच सत्त्वसंकोची फट
आपापल्या खेहोषी नशेत. लाटेवरती लाट
पाठपोटताना आपण कुरवाळत राहतो नकळत

लक्तरांचे कंगोरी काठ, ऐलपैलतट. जोपासतो
कट केल्यागत अहंखोर मीपण, मीत्व परीघ.

आणि या खिडकीवरची चिमणा नि चिमणी
क्षणभर मर्मरताच उर्मी भुलत झुलत राहतात.
एकतानतेत झोकून विसरतात भान, अभिमान.

तरीही आपण उजळत राहतो गंड-गर्व पूर्वपर्वांची
विस्कळीत उजळणी.... स्टफ करून ठेवलेल्या युगुली
म्युझियममधल्या नरमाद्यांसारखे.... पारख-पारखे.

## बझर गरजला

....बझर गरजला
दारावरचा गनिमी डोळा क्लिक करून
उघडून कानोसा घेतला. स्टेटस समानधमा

असलाच तर बाहेर काढावा क्रोकरी सेट
फ्रीजमधून भर्जरी ब्रेड ब्रेकफास्टलेला....
समोर उभा अनवाणी मुलगा. खिळखिळ्या

पिंजऱ्यासारखा. अंगात फाटक्या नशिबाचा
कुडता. म्हणाला, काल गुरवार, टाकता
नाही आला हार. आई आजारी, भावंडे

लहान चार.... लोटताना दार फटीत सापडले
शब्द 'गुरवार, हार.' आठवले काल पार्टीला
चापला कबाब-कुर्मा. ओशाळलो. सुटलो—

धावत. मारल्या हाका चहासाठी.... कुणीच
नव्हते बाहेर. दत्त म्हणून उभा होता फक्त
ब्लॉकचा एकान्त. सकळकाळी आक्रोशणारा.

## आरसा

ऊन बांधून ठेवता येत नाही खुंटाला आणि
तारुण्य. जसे हे हल्ली हल्लीचे आरशामधले सांप्रत–
बिंब. ब्लडप्रेशरच्या स्थूलतेत मळूलणारे.... नि

तुकतुकीत केसात फेसाळत लपणारा निर्झर-लोंढा.
आणि हा दमछाकी श्वास, अनागोंदी नेसणथाट
स्क्रू मारून तोंडावर अडकवलेला सिंथेटिक हुरूप

एक रमलदार पडदा हवा शिवायला या सर्वांवर
....का हा आरसाच काढायचा मोडीत—फक्कड नवा—

हारमोनी-हारमोन्सनी महिरपलेला येता घेईल विकत
निस्तेजता दिनांक बघून जसा हा जुनाट रेडिओ,
फ्रीज, कार– बावनचे मॉडेल.... सांग

माझाही चेहरा बघ जातोय डागळून, पारा उडून
ऊन बांधून ठेवता ठेवता खुंटाला– थांग लागू
देणारा हा आरसा कसा सांधणार, कुठवर कुणाला ?

## स्टफ करून ठेवलेला पक्षी

स्टफ करून ठेवलेला पक्षी
किती जिवंत दिसतो नाही ?
वाटते आता हा उडेल
फडफड करून अथवा डसेल
कर्कश ओरडून हाताला
म्हणून मी दूरच उभा राहतो
नाकात कोंबून तपकीर
तरतरी आणतो
नि मग बेफिकीरपणे सिगारेटी
धुराची
देतो लोटून आकाशगंगा त्याच्यावर.
तरी तो स्तब्धच उभा राहतो
मी भेदरतो त्या स्तब्धतेने
खिशात लपवून मनाची मरगळ,
छपवतो मी डोळे चष्म्याआड
केसही करतो डायने काळे
पण हे सारे तो पहात नसेल ना
आपल्या उघड्या बेबंद डोळ्यांनी ?
नाही तर जायचा उडून
कपाटातले आकाश सोडून
आकाशाच्या कपाटात.... तो गेला
तर कपाटात कोण बसणार
श्वास
रोखून ?.... काय ? मी !!

## म्हटले हे काही खरे नाही

उतू जायला लागली
तिच्या वक्षा-नितंबावरची गोलाई
तशी ती निघाली
पालण घालायला पडावागत....डुलत
मी चरकलो. म्हटले हे काही खरे नाही.
लाटालाटांवर ती भर्कटत
राहिलीच नाही. पडावाने मात्र
गोलाई फुगवून
रक्तचिंब सूर्याला हळूहळू मोठे केले
आता ती मुलाला वाढवतेय
तोही होतोय मोठा पडावाच्या शिडासारखा
सूर्यभोर

## जगेन म्हणतो

जगेन म्हणतो — कसा बसा
हसेन म्हणतो — ढसा ढसा
फुलेन म्हणतो — कोमेजून
हलेन म्हणतो — हेलावून

तापेन म्हणतो — होत थंड
फेकीन म्हणतो — न्यूनगंड
डुलेन म्हणतो — पेल्यावर
रुजेन म्हणतो — मेल्यावर

पळेन म्हणतो — आगे आगे
लढेन म्हणतो — मागे मागे
आतला आवाज — असा कसा ?
आरशावरचा — भास जसा !

## झाड

कंटाळून कंटाळून आता मी एक
झाड झालोय. माझ्या रुक्ष, निष्पर्ण
फांद्या-दांडोऱ्यांतून वसंत दर्वळताना

मला पालवी फुटतेय. इवलाली ती पाने
हलकेच ढवळतायत सतत वाऱ्याला....
मी मात्र उभा आहे क्षितिजापार लोटत

आकाशाला. माझ्या पाठीवर आहे
पहाडाची थैली. जसा एखादा वारकरी
तसा मी उभा. उद्या कदाचित एखादा

पक्षी दूरवरून उडत येईल. हलकेच
माझ्या रुक्ष—निष्पर्ण फांद्या-दांडोऱ्यांतून
टुणटुण नाचत राहील. नवी नवलाई

सरली की झोपून जाईल आणि नेहमीची
सकाळ उगवली की स्वप्नासारखा उडून
जाईल....फाटलेल्या आकाशातून पुन्हा

तो परत येईल म्हणून मी जगत राहीन
आणि कंटाळून कंटाळून एक दिवस
मातीवर पाय रोवून चालणारा माणूस होईन.
तेव्हा मला झाडाच्या नावाने हाका मारू नका.

## माझे हात इतके लांब व्हावेत

माझे हात इतके लांब व्हावेत
की त्यांच्या कवेत क्षितिज शिरावे
पण क्षितिजालाही पाय असतात
जे माझ्या हातांना चार हात
दूर ठेवतात.... आता काय करावे ?

मला चार पाय फुटले
तर काय होणार आहे ? छानच होईल
निदान क्षितिज डोळ्यांसमोर
दिसून दिसणार नाही

चरताही येईल मनसोक्त....
अपयशांचे करपट कोंभ खात

REFBK-0022315
REFBK-0022315

## फिरवता येत नाही काळ

ठेवता येत नाही फसवणूक झाकून
टोपली टाकून. झाकण बंद केले तरी
अस्वस्थता धुमसत राहते फुसफुसत.

जिथे चार कोल्हे वाचकरतात थडगे
तिथेही उगवतो कालांतराने
कोंभ-कोवळा धुमारा....
टोरा टोरा टोरा

जखडवलेला हुंकार
अल्गद्‌ धरणीकंपून वर येत राहतो
मातीच मातीला आकार देत असते.

ही सुरवात असते
एका अखेरीची
शब्द कसेही फिरवा—अनुशासन पर्व
दुःशासन गर्व....फिरवता येत नाही
काळ
चाल बांधलेल्या पायांसारखा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
22394
दा. क.
2302

# युकॅलिप्टस

## सुरेश मथुरे



'युकॅलिप्टस'मधल्या सुरेश मथुरे यांच्या कवितेला तिचे स्वतःचे वेगळेपण आहे. हे वेगळेपण, कवीच्या सौंदर्यदृष्टीच्या पाठीशी उभी असलेली कल्पकता, तिच्या साह्याने त्यांना जाणवलेले जीवनानुभवाचे रूप आणि ह्या अनुभवांना व्यक्त करणारी मथुरे यांची स्वतंत्र लेखनशैली यांतून निर्माण झालेले आहे. सामान्यतः काव्यविषय होणाऱ्या विविध प्रकारच्या अनुभवांचे चित्रण 'युकॅलिप्टस'मध्ये आहेच, परंतु या संग्रहाचा एक विशेष असा की, शास्त्रीय प्रगतीमुळे मुंबईसारख्या शहरातील बदललेल्या जीवनातून अस्तित्वात आलेले अनेक नवे अनुभव या कवितांत आलेले आहेत. परंपरेद्वारा आलेली संस्कृती आणि नवनव्या साधन-उपकरण-संकल्पनादींना घेऊन आलेली नव्या युगाची संस्कृती या दोन्हींतून येणाऱ्या घटकांमधून सुचणाऱ्या प्रतिमा-प्रतिकांतून मथुरे यांच्या कवितेचे रूप घडते. यात लपाछपीच्या खेळातील 'साई सुट्यो'पासून ते जत्रेतल्या 'जायंट व्हील'पर्यंत, श्रवणबेळगोळाच्या गोमटेश्वरापासून मुंबईतल्या उत्तुंग 'स्कायस्क्रेपर'पर्यंत, तसेच दिमाखात उभ्या असलेल्या कोडाईकॅनालच्या डोंगरदऱ्यातील युकॅलिप्टसपासून ते कृत्रिम पद्धतीने वाढविलेल्या आर्किडपर्यंतचे विविध प्रकारचे जग येत राहाते. सामान्यतः ज्यांचे गोत्र जुळणार नाही असे वाटावे अशा घटकांना एकत्रित आणून, तसेच अगदी नवनवीन शब्द निर्माण करून आणि लयीच्या द्रुत-विलंबित सरणीमधून विशिष्ट सौंदर्याविष्कार साधीत जाण्याचे मथुरे यांचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. हे सर्व असूनही 'युकॅलिप्टस'मधली कविता यांत्रिक, कोरडी वा कृत्रिम झालेली नाही. ती सहजसुंदर, रूपाने टवटवीत व भावनादृष्ट्या रसरशीत आहे—सूक्ष्म दृष्टीने पाहणारीही आहे.

किंमत आठ रुपये

म–४१४

पॉप्युलर प्रकाशन